वर्ष : सतरावे
जुलै २०२५
अंक : सातवा
मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ५२

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

आपल्या संपूर्ण देशाची बँक म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक !
तिची स्थापना, आजवरचा प्रवास, भूमिका आणि कार्यपद्धती तसेच भारतासारख्या खंडप्राय विशाल देशाच्या वाटचालीत असलेला महत्त्वपूर्ण सहभाग...
हा सर्व रोचक इतिहास अत्यंत रंजक पद्धतीने सांगत आहेत
सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ **विद्याधर अनास्कर**.

तेव्हा जरूर वाचा - गोष्ट रिझर्व्ह बँकेची.



फादर दिब्रिटो -

ख्रिश्चन साधना - धर्मनिष्ठेने अनुसरलेले आणि महाराष्ट्रधर्म जिवापाड जपलेले विश्वाचे नागरिक. त्यांनी मराठी भाषेच्या अंगणात ललित साहित्याचे मळे फुलवले. धर्मांची डोळस चिकित्सा केली आणि भक्तीला सामाजिक कार्याची जोड दिली. धर्मकारणासोबतच पर्यावरण रक्षणाचा वसा घेतला.

गगनाचा रहिवासी असलेल्या या साहित्यिकाच्या प्रथम स्मृतिदिनी सादर होत आहे -

## सर्वोत्तम व समकालीन

# फादर दिब्रिटो

संकलन व संपादन

**करुणा गोखले**



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

# राजहंस ग्रंथवेध

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
तृप्ती देशपांडे

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

वर्ष सतरावे :
अंक सातवा
१५ जुलै २०२५
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  - *संघातील मानवी व्यवस्थापन*
  - प्रा. रवींद्र भुसारी / ९
  - *वसुंधरेचे शोधयात्री* - सारिका कुलकर्णी / ११
- गाऊ त्यांना आरती
  - *नेहरू : नवभारताचे शिल्पकार* / १५
- अभिजात मराठीची अक्षरप्रभा / १९
- असे जन्मले पुस्तक!
  *वस्त्रगाथा* - विनय नारकर / २३
- आठवणींचा पारिजात
  - *राहून गेलेली भेट* - प्रा. द. दि. पुंडे / २७
- क... कवितेचा - चैतन्य सदाशिव डुम्बरे / ३१
- उद्‌गार -
  *ज्याचं त्याचं एव्हरेस्ट* - अश्विनी देव / ३३
  *सो कुल.. टेक २* - उदय म्हांबरे / ३६
- राजहंसी पार / ३९
- वाचकांच्या मनातलं... / ४३

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके

*शिवाजी महाराजांच्या उपलब्ध असणाऱ्या सर्वांत जुन्या चित्रापासून अगदी अलीकडे उभारल्या गेलेल्या पुतळ्यापर्यंत शंभरहून अधिक कलाकृतींची संदर्भासह माहिती वाचकांना येथे मिळणार आहे. चित्र, शिल्प प्रत्यक्ष पाहतो आहोत असा अनुभव देणारी चित्रकथी शैली हे पुस्तकाचे वैशिष्ट्य. चित्र कसे पाहावे, त्याचा अभ्यास कसा करावा याचे अप्रत्यक्ष प्रशिक्षणच कलाशिक्षक बहुळकरांनी येथे दिले आहे. चित्रकला, शिल्पकला अशा दालनांमधून कालक्रम सांभाळत लीलया संचार करणाऱ्या बहुळकरांची ही शोधयात्रा रसिकांप्रमाणेच जाणकार वाचकांसमोरही काही प्रश्न उपस्थित करते; आजवर अज्ञात असणारी कलेतिहासातली संदर्भसाधने उजेडात आणू पाहते. प्रत्येक शिवभक्ताच्या संग्रही असावी अशी साहित्यकृती...*

**संपादक : आनंद हर्डीकर**

### कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या!

सुहास बहुळकर

किंमत : ₹ १०००/-
सवलतीत ₹ ७५०/- (१५ ऑगस्टपर्यंत)
(ट.ख. ₹ १००)



*हे एक अगदी वेगळं पुस्तक आहे. म्हटलं तर आत्मचरित्रात्मक आहे.*
*आयुष्य सजगपणे आणि भरभरून जगताना मनात आलेले विचार, भावना, कल्पना, कधी घेतलेले काही निर्णय अवतीभवतीची माणसं, त्यांचं वागणं, वेगवेगळी परिस्थिती असं सगळंच दिसतं यात. या गोष्टींकडे जाणीवपूर्वक बघताना मला जे गवसलं ते यात मांडलंय. 'घरगृहस्थी' नावाचं एक भव्य कोलाज इथं साकारलंय. हे वाचून वाचणारे लिहिते झाले तर मला भरून पावलं असं मी म्हणेन.*

**सरोज देशपांडे**

### कहाणी घरगृहस्थीची

सरोज देशपांडे

किंमत : ₹ १५०/-
(ट.ख. ₹ ५०)



# संपादकीय

*भौतिक जगातील कोणत्याही सामान्य सुखासाठी भावनिक आवाहन करणारा नियोजनबद्ध प्रवास म्हणजे काही ही वारी नव्हे; केवळ परिसर बदलही नव्हे. वाचू या - वारी आणि मानवी जीविताचा हा अनुबंध...*

नमस्कार वाचकहो,

'नित्यनेम' हा जोडशब्द पाहा! नेमाने, अखंडितपणे घडणाऱ्या घटितासाठी आपण हा शब्द योजतो. जसं की... सृष्टी नित्यनेमाने वर्षते, अंकुरते, बहरते, फळते; थंडीची दुलई पांघरते नि अळूमाळू धुके बाजूला सारत निरभ्र गगनाला आपली ओल देत, घनमालांनी भारून टाकत आपली कूस उजवण्यासाठी दाह सोसत त्याला झिमझिमवतेही. पण आताशा या ऋतुचक्रानंही आपली कूस बदललीय. एरव्ही जूनमध्ये दाखल होणाऱ्या पर्जन्यराजानं मे महिन्याच्या मध्यावरच हजेरी लावून सगळ्यांची चांगलीच त्रेधातिरपीट उडवून दिली. अलीकडच्या काळात ऋतुचक्राचा असा नेम चुकत चाललाय. नित्यता ढळू लागलीय आणि या अघटितानं आपणही संभ्रमित झालोयत. आता आपल्याला या बदलाला असेच सामोरे जावे लागणार की पुन्हा घडी बसणार हे येणारा काळच ठरवेल.

असं असलं तरी संभ्रम दूर करणारी, मनाला - चित्ताला शांतवणारी एक गोष्ट मात्र गेली काही शतके याच सृष्टीकडून 'नित्यनेम' शिकलेल्या माणसांच्या जगात अखंडितपणे सुरू आहे. ती म्हणजे 'आषाढी वारी'. कोरोना संसर्गाचा काळ सोडला तर ही वारी ज्ञानदेवांच्या काळापासून अखंडितपणे सुरूच आहे.

सध्या सर्वत्र हे भक्तीरसपूर्ण वारीमय वातावरण आहे. म्हणूनच या विषयासंदर्भानं आपणासमोर काही मांडावं असं ठरवलं. 'आषाढी वारी' विषयीचं एक वेगळं चिंतन इथं तुम्हां जाणत्या वाचकांसमोर ठेवत आहोत.

'जाता पंढरीसी सुख वाटे जीवा...' असं भक्तांचं मानस असलं तरी, भौतिक जगातील कोणत्याही सामान्य सुखासाठी भावनिक आवाहन करणारा नियोजनबद्ध प्रवास म्हणजे काही ही वारी नव्हे. सामाजिक एकात्मतेचं प्रतीक असणारा हा प्रवास म्हणजे केवळ परिसर बदलही नव्हे. 'स्वधर्म'रूपी देवतेची

उपासना करायला सांगताना ज्ञानेश्वर माउली म्हणतात, *तुम्ही व्रतनियम न करावे । शरीराते न पीडावें । दूरी केंही न वचावें । तीर्थासि गा ॥३.८९॥ देवतांतरा न भजावे । हे सर्वथा काही न करावें । तुम्ही 'स्वधर्म'यज्ञी यजावे । अनायासे ॥३.९१॥* माउलींनी दाखवलेला हा स्वधर्माचा प्रवास वारकरी न थकता, न त्रासता आधी या वारीतूनच शिकतात. सावतामहाराजांसारखे संत आपल्या कर्माठायी राहूनच हा स्वधर्म जगले. दुष्काळाचं संकट आल्यावर गोरगरिबांची सेवा करण्यासाठी तुकोबारायांनाही वारी चुकवावी लागली. पण पांडुरंगाशी असलेलं या संतांचं अनुसंधान अखंडित होतं. म्हणूनच तर तुकोबा म्हणतात, *''योग याग अनंत केले । नाही समचरण देखिले ॥ तुका म्हणे विठ्ठलपायी । अनंत तीर्थे घडली पाही॥''* ईश्वराचं खरं स्वरूप ज्ञात नसताना, त्याची अनुभूती नसताना निर्गुणी भक्तीच्या वाटेवरून चालणं सामान्यजनांना धोकादायक आहे. म्हणूनच पंढरपूर वारीचा 'भागवत संप्रदाय' झाला. अनेक देवतांची आराधना - उपासना करण्यापेक्षा पंढरीचा श्रीविठ्ठल हेच लोकदैवत संतपरंपरेनं निवडलं. 'ज्ञानेश्वरी', 'तुकाराम गाथा' यांसारखे 'भक्तिमार्गप्रदीप' संतांनी भक्तांसमोर ठेवले. त्यासाठी पंढरीच्या आषाढी-कार्तिकी वारीची सार्वजनिक आचारसंहिता भक्तांना घालून दिली.

वाचकहो, पंढरीची वारी ही 'दिंडी' आहे; माणसांच्या विकारी झुंडीला त्यात जागा नाही. इथं प्रत्येक जण एकमेकांसाठी माउली आहे. किती सुंदर आहे हा भाव! माउली-माउली म्हणत एकमेकांसमोर नतमस्तक होण्यात केवढं समाधान आहे! विविध पालख्या, वारकऱ्यांच्या निवास-भोजनाची सहज होणारी व्यवस्था, वाटेवर होणारी कीर्तनं-प्रवचनं, हरिनामाचा अखंड गजर, स्त्री-पुरुषांचा लिंगभेदापलीकडे जाऊन वारीत असलेला सहभाग, फुगड्या-रिंगणं यांसारखे खेळ, अन्नदान, वैद्यकीय मदत यातून घडणारं सहकाराचं सेवेचं आणि माणुसकीचं दर्शन हे सारंच विलक्षण आहे. महाराष्ट्रातील ही प्राचीन अशी भक्ती परंपरा, व्रतस्थ तीर्थयात्रा आहे. अनेक ओहोळ जसे एका नदीला येऊन मिळतात तसे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक दिंड्या, पालख्या आषाढ शुद्ध एकादशीला पंढरपुरात जातात आणि विठोबाचं दर्शन घेतात. आजच्या आधुनिक युगात समाजमाध्यमांमुळे जग वारीशी जोडलं गेलंय. वारीतील वारकऱ्यांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन आरोग्य सेवा, मोबाईल रुग्णालये, पोलीस यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्थांचा समावेश वाढला आहे. प्लॅस्टिकमुक्त वारी, पर्यावरणपूरक वारी या संकल्पना रुजत आहेत. तरुण पिढीचा सहभाग वाढतो आहे. हे आश्वासक चित्र असले तरी समाजाची दुसरी बाजूही आपण विचारात घेतली पाहिजे.

आज समाज जातीपातीच्या, विचार-मतांच्या, विविध जीवनशैलींच्या, राजकीय प्रणालींच्या पातळीवर विघटित होतोय. मानवतेच्या मुख्य धारेपासून

वेगळा होताना, असहिष्णू आणि हिंसक होताना दिसतोय. या पार्श्वभूमीवर वारीचं महत्त्व, हेतू आणि व्यापकपण आपण विचारात घेऊ. व्यक्तिगत प्रगती हे मानवी जीविताचं अंतिम साध्य नाही. समाजातील काही ज्ञानवंत जसे की, खेळाडू-कलावंत-विचारवंत-नेते-अभिनेते-कीर्तनकार-प्रवचनकार-साहित्यिक-शास्त्रज्ञ हे स्वतंत्र बेट म्हणून न जगता सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी झटत असतात. सामाजिक जाणिवेचं हे व्यापकपण प्रत्येक जीवमात्राच्या ठायी रुजावं,वाढावं. सहजीवनाचा हा गाभा भागवत धर्म आणि श्रीविठ्ठल वारीमध्ये अद्याहृत आहे. *''मार्गाधारे वर्तावें । विश्व मोहरें लावावें । अलौकिक नोहावें । लोकांप्रति ॥३.१७१॥''* वारीत सहभागी होणाऱ्या भक्तांसाठी ज्ञानेश्वरांचा हा संदेश आहे. त्याचं मोल जाणलं तर समाजाचं म्हणजेच प्रत्येक व्यक्तीचं विघटन न होता त्याचं संवेदन एकात्म होईल. वारीचा प्रवास माणूसपणाच्या अनुभूतीचा विस्तार व्हावा, प्रत्येक जीवाची अंत:प्रवास करण्याची प्रक्रिया गतिमान व्हावी.

पंढरीच्या वारीप्रमाणेच ज्ञानपंढरीची 'साहित्यवारी'ही अशीच मानवी जीविताचा श्वास व्हावी. त्यातून केवळ माहिती ज्ञात न होता आत्मज्ञानाचा, आत्मस्वरूपाचा प्रकाश झिरपावा. संतसाहित्य रंजनातून, सामान्य जगण्यातल्या उदाहरण - दाखल्यातून आपल्याला खोल जीवनबोध घडवतं, अंतर्मन शुद्ध करतं. वारी हा भक्तांचा वर्षातून एकदा घडणारा पंढरपूर क्षेत्राचा प्रत्यक्ष प्रवास आहे; मात्र संतांच्या शिकवणुकीचा, ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा सामान्यजनांना आजच्या सुबोध भाषेतून प्रवास घडवलाय तो म. वा. धोंड यांसारख्या साहित्यिकांनी. त्यांच्या 'ऐसा विटेवर देव कोठें!' या पुस्तकात त्यांनी श्रीपांडुरंगाचे वर्णिलेले वेगळेपण लक्षणीय आहे. ते म्हणतात, ''आजवर देवाने जे जे अवतार धारण केले ते सज्जनांच्या परित्राणासाठी व दृष्टांच्या विनाशासाठी परंतु विठ्ठलाचा अवतार हा केवळ पुंडलिकाला भेटण्याच्या आनंदासाठीच झाला आहे. पांडुरंगाला 'आधी आपले कर्तव्य आणि मग देवाची भक्ती' ही पुंडलिकाची वृत्ती आवडली म्हणून तो युगे अठ्ठावीस तिष्ठत राहिला आहे.'' पुढे ते ज्ञानेश्वरीचा दाखलाही देतात - *''विहित कर्म पांडवा । आपुला अनन्यु वोलवावा । आणि हेचि प्रेमसेवा । सर्वात्मकाची ॥१८.९०२॥''* भागवत धर्माची ही शिकवण त्यांनी यथार्थपणे सांगितलीय. चिंतनाची वारी घडविणारे असे साहित्य सदोदित आपल्या जाणिवेत असावे.

वारीचा आणि साहित्याचा अनुबंध आध्यात्मिक आहे. तो अंतरीचा ज्ञानदिवा अखंड तेवत ठेवणारा आहे.

वारी चालते, आणि आपल्याला चालायला शिकवते.

बाह्याकडून आत, स्वत:पर्यंत!

***प्रिया निघोजकर,*** कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




शास्त्रीय संगीतातही आपले वेगळे, वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या, संगीतक्षेत्रात लखलखती कारकीर्द साकारणाऱ्या माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समग्र वर्मा परिवाराच्या कलाकर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या स्मृतिचित्रांचा वेधक शब्दपट -

### माणिक मोती

माणिक वर्मा आणि परिवार

शोभा बोंद्रे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)



रा. स्व. संघातून तयार झालेल्या स्वयंसेवकांनी संघाच्या संस्कारबळावर विविध संघटनात्मक कार्ये उभी केली. विविध सेवाकार्यांत त्यांनी कार्य केले. हाच शक्तिसाठा म्हणजे 'संघपरिवार'. 'सामान्यांतल्या असामान्य क्षमता फुलवून मोठी कामे करणारी संघटना म्हणजे रा. स्व. संघ'

### संघातील मानवी व्यवस्थापन

एका स्वयंसेवकाच्या नजरेतून

नितीन गडकरी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)



हे एका शहाण्या मुलीचं मर्मस्पर्शी लिखाण आहे. तिच्याकडे जीवन समजून घेण्याची असोशी, विचारपूर्वक जगण्याचं भान आहे. तिच्या मनातली विचारवादळं आणि अनुभव, यांतूनच नव्याने विणलेले...

### एक उलट... एक सुलट : भाग २

अमृता सुभाष

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)

## संघातील मानवी व्यवस्थापन

*हा ग्रंथ केवळ ललित साहित्याने भरलेलं एक पुस्तक नाही,*
*तर ती आहे एक अनुभवांची सरिता, भारतीय भावधारेची चिंतनमय गंगा*
*आणि भारतीय व्यवस्थापनशास्त्राचा एक मौलिक दस्तऐवज!*

केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांच्या लेखणीतून साकारलेल्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' या ग्रंथाचे नागपुरात विमोचन संपन्न झाले. लगेच हा ग्रंथ हाती आला आणि चाळता चाळता पूर्ण वाचून संपला. तेव्हाच भानावर आलो. हा ग्रंथ केवळ ललित साहित्यानं भरलेलं एक पुस्तक नाही तर ती आहे एक अनुभवांची सरिता, भारतीय भावधारेची चिंतनमय गंगा आणि भारतीय व्यवस्थापनशास्त्राचा एक मौलिक दस्तऐवज!

नितीनजी तसे लेखक नाहीत तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आहेत, अभाविपचे पूर्व कार्यकर्ते आहेत तसेच संसदीय कार्याचा दांडगा अनुभव गाठीशी असलेले, अनेक वेळा निवडून आलेले कार्यतत्पर जनप्रतिनिधी, कुशल प्रशासक, आणि कर्मयोगी असे केंद्रीय मंत्री म्हणून देश-विदेशात परिचित आहेत.

गडकरीजींची लेखणी ही केवळ विचारांनी नव्हे, तर अनुभवांनी ओतप्रोत भरलेली आहे. या ग्रंथात त्यांनी संघातील कार्यपद्धती, मूल्यव्यवस्था आणि मानवी मनोविज्ञान यांना अतिशय प्रभावी आणि संयतपणे मांडले आहे. त्यांचे शब्द हे अनुभवांची शिदोरी असल्याने ते अगदी जिवंत वाटतात. ते संघाच्या शिस्तबद्ध, संस्कारित कार्यपद्धतीचे असे वर्णन करतात, की वाचक स्वत: शाखेत सहभागी असल्याचा अनुभव घेतो.

या ग्रंथातील एक एक प्रकरण म्हणजे संघकार्याच्या एका अनोख्या पैलूचे सुंदर दर्शन आहे. ग्रंथाच्या आरंभी 'संघ स्कूल ऑफ मॅनेजमेंट' ही संकल्पना पुढे आली असून, पारंपरिक एमबीए किंवा व्यवस्थापन संकल्पनांपेक्षा संघाची कार्यशैली मानवी मूल्यांवर आधारलेली असल्याचे अधोरेखित केले आहे. 'शाखा : मूलस्थान व बल स्थान' या प्रकरणात शाखेच्या माध्यमातून मनुष्य घडवण्याची प्रक्रिया उलगडली जाते. 'कुशल संघटक' या प्रकरणात नेतृत्ववृत्ती, निर्णयक्षमता आणि सामूहिक उभारणी याचे मनोवेधक विश्लेषण आहे. 'तीनदा बंदी आली तरी अजिंक्य' हे प्रकरण संघाच्या असामान्य सहनशक्तीचा साक्षात्कार घडवते. गडकरीजी हे केवळ सांगतच नाहीत, तर

जगवतात! संघामध्ये व्यक्तिमत्त्व घडवले जाते आणि त्याचा उपयोग राष्ट्रकार्यासाठी केला जातो हे येथे अगदी साध्या, सोप्या शैलीत मांडले आहे. नेतृत्व म्हणजे सेवा व समर्पण हे यातून सहजपणे लक्षात येते. मानवसंसाधन ही संघाची खरी संपत्ती आहे. संघ कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षण पद्धती, सेवा क्षेत्रातील योगदान, समाजाभिमुख नेतृत्व हे बिंदू अगदी सहज चर्चा करतो तसे या ठिकाणी उलगडले आहेत.

पू. बाळासाहेबांचे विलक्षण व्यक्तिमत्त्व व कर्मयोगी भाऊराव देवरसांच्या जीवनकार्याची केलेली मांडणी म्हणजे संघसाधनेचे अगदी जिवंत प्रगटीकरणच. 'संघातील मानवी व्यवस्थापन' हा ग्रंथ म्हणजे संघाच्या जीवनपद्धतीचे तत्त्वचिंतन, संघटनेचे आत्मसत्त्व आणि कार्यसंस्कृतीचे सजीव वर्णन आहे. ग्रंथाच्या शेवटी दिलेली संघगीते, संचालन पद्धती, पूर्वोत्तर भारतातील सेवा कार्य आणि मानव संसाधन प्रशिक्षण यांचा अभ्यासपूर्ण दस्तऐवज असल्यासारखा परिचय दिला आहे. परिशिष्टांचा हा भाग संघाच्या कार्यपद्धतीचे प्रात्यक्षिक स्वरूप स्पष्ट करतात.

संघाच्या कार्यपद्धतीकडे अनेक जण बाह्य स्वरूपातून पाहतात, परंतु श्री. नितिनजींनी आंतरिक तत्त्वधारा, मूल्यप्रेरणा आणि माणूस घडवण्याची विज्ञानसिद्ध प्रक्रिया आपल्या लेखणीतून अत्यंत प्रभावीपणे मांडली आहे. या ग्रंथात 'हिंदुत्व म्हणजेच मानवतावाद', 'राष्ट्रनिर्माण आणि संघटन', 'नक्षत्रमालेतील निरंतरता', अशी प्रकरणे आहेत जी वाचताना आपल्या जाणिवा अधिक समृद्ध होत जातात, संघकार्य करताना अनेक स्वयंसेवकांनी किती खस्ता खाल्ल्या, आपले जीवन संघटनेला कसे स्वाहा केले हे वाचताना मन भावविभोर होतं. विशेष म्हणजे हे सगळं व्यवस्थापन शास्त्राच्या पारंपरिक चौकटींपेक्षा वेगळं आहे म्हणजेच संघकार्य हे एक 'भारतीय व्यवस्थापनाचे उत्तम मॉडेल' हे सोदाहरण या ग्रंथात वाचायला मिळतं.

या ग्रंथात मानव संसाधन विकासाचे तत्त्वज्ञान आहे, संघटन शास्त्राचा आत्मा आहे आणि राष्ट्रनिर्माणाची दिशा आहे. या ग्रंथाचे वाचन हे केवळ माहिती मिळवणे नाही, तर 'मनुष्य घडवण्याची प्रक्रिया' समजून घेण्याचे एक प्रकारचे प्रशिक्षण आहे असे म्हणता येईल.

आणखी विशेष म्हणजे या ग्रंथाला प्रसिद्ध तत्त्वचिंतक श्री. विवेक घळसासी यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना म्हणजे अमृतानुभवच. ही प्रस्तावना म्हणजे श्री. विवेकजींच्या ओजस्वी लेखणीतून या संपूर्ण ग्रंथाची दिशा दर्शवणारा एक देदीप्यमान दीपस्तंभ आहे. श्री. नितिनजींच्या मनोगाभाऱ्यातील भावनेला अगदी त्यांच्याच शब्दांत व्यक्त करण्याची किमया श्री. शैलेशजी पांडे यांनी उत्तमपणे पार पाडली आहे. संघविश्वातील ऋषींना हा ग्रंथ समर्पित करून श्री. नितीनजींनी आपली कृतज्ञताच व्यक्त केली आहे. या ग्रंथनिर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या प्रज्ञावंतांची मांदियाळी बघितली की एकूणच या विषयाची गुणवत्ता आणि महत्त्व लगेच अधोरेखित होते.

मानवी व्यवस्थापन म्हणजे केवळ कौशल्य, धोरणे वा तंत्रज्ञान नव्हे, तर

त्यामागील मूल्य दृष्टिकोन, सांस्कृतिक परंपरा आणि समर्पित नेतृत्व हेच खरे स्तंभ असतात. श्री. नितीन गडकरी यांच्या 'संघातील मानवी व्यवस्थापन' या ग्रंथात अशाच व्यवस्थापन दृष्टिकोनाची सखोल मांडणी केवळ विचारपूर्वकच नव्हे, तर स्वानुभवावर आधारित पद्धतीने केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व्यवस्थापन म्हणजे एका मूल्यविहित आणि ध्येयवेड्या स्वयंसेवकांद्वारे चालवलेली 'सजीव संस्था' याचे हे पुस्तक साक्षात उदाहरण आहे. हा ग्रंथ वाचल्यावर 'जीवन तो वही, जो समाज को दिशा दे। लेखन वही, जो चेतना जागृत करे।' या ओळी अगदी सार्थ वाटतात.

हा अनुभवसंपन्न ग्रंथ संघ कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक, प्रशिक्षणार्थींना पाठ्यपुस्तक, आणि चिंतनशील वाचकांसाठी प्रेरणाग्रंथ ठरतो.

मा. श्री. नितीनजींचे मनापासून अभिनंदन, त्रिवार अभिनंदन.

***प्रा. रविंद्र भुसारी,*** नागपूर
९५९४७५३४४४

---

## वसुंधरेचे शोधयात्री

गॅस्ट्रोएंट्रोलॉजी / हिपॅटॉलॉजी अशा आम्हाला अगदी उच्चारता येणार नाहीत अशा विभागांचे डॉक्टर असलेल्या अनुराग लव्हेकर यांना एकंदरच अवघड विषयांची भलती आवड असावी. आपल्या डॉक्टरी व्यवसायाशी अजिबातच संबंधित नसलेल्या इतिहास आणि भूगोल अशा विषयांशी निगडित 'वसुंधरेचे शोधयात्री' हे त्यांचे पुस्तक मागच्या काही दिवसांत अधाश्यासारखे वाचून काढले.


'भूगोलाच्या रंगमंचावर इतिहासाचे नाट्य सादर होत असते.'
या विधानाची प्रचिती देणाऱ्या -
आपल्या शोधयात्रांमधून नवा इतिहास घडवणाऱ्या
शोधनायकांची गाथा.

वसुंधरेचे शोधयात्री

डॉ. अनुराग लव्हेकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. ₹ ५०)




पुस्तक वाचायला नेहमीपेक्षा जास्त वेळ लागला. पुस्तकाचा विषय तसा थोडासा अवघड आहे, पण डॉक्टरांची कमाल अशी की त्यांनी तो रोचक बनवला आहे. लिखाणात हे द्वय क्वचितच आढळते. इतिहास म्हटले की एकतर तो गोष्टीरूपात पुढे येतो किंवा भूगोल म्हटले की तो रूक्ष होतो. पण याची बरोबर मध्यरेषा डॉक्टरांनी पकडत वाचकांची पुस्तकावरील पकड मजबूत केली आहे. ऑफिसच्या दिवशी जेवणाच्या वेळी मागवलेला पिझ्झा जसा पाच मिनिटांत खाऊन आपण संपवतो तसे न करता सणाच्या दिवशी चवीने पुरणाच्या पोळीचे निवांत जेवण करावे तसे या पुस्तकाचे करावे लागते. सुगरणीने पुरण जीव ओतून रांधावे तसे डॉक्टरांनी संपूर्ण मनाने पुस्तक लिहिले आहे. जागोजागी संदर्भसूची, नकाशे यांमुळे पुस्तकातील अवघडपणा कमी होत जातो.

एकंदरच जगाच्या आणि स्वत:च्या निर्मितीचे आकर्षण मनुष्य जातीला वाटत राहिलेले आहे. आपण कुठून आलो, मूळ इथलेच होतो का, मी कोण आहे असे प्रश्न आयुष्याच्या कुठल्यातरी टप्प्यावर माणसाला पडल्यावाचून राहत नाहीत. माणूस चिकित्सक, शोधक वृत्तीचा प्राणी आहे. या वृत्तीतून त्याचा प्रवास जन्माला येतो. स्थलांतर हा त्याचा स्थायिभाव आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतच माणूस प्रगत होत राहिला. हाच प्रवास नंतर शिस्तबद्ध होत गेला. नवनवीन ठिकाणे, देश शोधून काढण्याची, त्यावर सत्ता स्थापन करण्याची ओढ माणसाला लागली. वसुंधरेच्या अशा विविध ठिकाणांच्या शोधाची गाथा म्हणजे हे पुस्तक आहे.

पृथ्वीसाठी डॉक्टरांनी योजलेला 'वसुंधरा' हा शब्दप्रयोग मला फार आवडला. पृथ्वी, धरा असे कित्येक इतर समानार्थी शब्द असताना डॉक्टरांना वसुने धारण केलेल्या वसुंधरेने साद घातली. हे त्यांच्या विचारीपणाचे लक्षण वाटते. भूगोल आणि इतिहास या दोन्हीची फार छान सांगड पुस्तकात घातलेली आढळली. जगाच्या वेगवेगळ्या भागांतून प्रवास करणारे खलाशी, नाविक यांनी अडचणींवर मात करत शोधलेले नवनवे प्रदेश, त्यातून पुढे आलेला इतिहास यांची माहिती या पुस्तकात मिळते. तसे हे पुस्तक म्हणजे या सगळ्या सागरी सफरींचा धावता आढावा आहे. लहानपणी कधी इतिहासातून तर कधी भूगोलातून भेटलेले कोलंबस, वास्को द गामा, भारतात हापूस आंबा आणलेला अल्फोन्सो आल्बुकर्क अशी माणसे थोडीफार ठाऊक होती. पण जगाच्या सागरी सफरीत यापलीकडे कितीतरी गोष्टी आहेत. त्या या पुस्तकातून समोर येतात. जगाच्या वेगवेगळ्या प्रदेशांच्या शोधास कारणीभूत ठरलेले हेनरी नेव्हिगेटर, अमेरिगो वेस्पुसी, जिल इएन्स, डिएगो कॅओ, काब्राल अशी माणसे या इतिहासात किती महत्त्वाची आहेत हे कळते.

इतक्या संक्षिप्त स्वरूपात जवळपास १८५० वर्षांच्या सागरी मोहिमांचा आढावा घेणे म्हणजे मला तरी माणसाने आकाशाला कवेत घेण्याचा प्रयत्न

करण्यासारखे वाटले, जे डॉक्टरांनी करून दाखवले आहे. या सागरी मोहिमा सुरू होण्यामागची प्रेरणा, त्यामागचे राजकारण, विविध साम्राज्यांना त्यातून होणारे फायदे, त्यासाठी कित्येक राजांनी पत्करलेले चुकीचे मार्ग, भूगोलाविषयी असलेले चुकीचे समज, यशस्वी आणि अयशस्वी मोहिमा, यशस्वी मोहिमेनंतर गुलामांना सहन करावा लागणारा अत्याचार असे सगळे वाचताना कधी आश्चर्य तर कधी भय वाटते. युरोपीय लोकांची दस्तऐवज नोंदीची, प्रवासाच्या नोंदीची शिस्त, भारतीय माणूस त्यात किती मागे आहे यावर डॉक्टरांनी खास त्यांच्या शैलीत केली टिपणी हे मोठे रंजक वाटले.

कित्येक देशांचा यशस्वी शोध लावणारे खलाशी आपल्याला ठाऊक आहेत. पण त्या शोधाच्या आधी अयशस्वी प्रयत्न करणारे कित्येक खलाशी आहेत ज्यांच्या नोंदींचा अभ्यास केल्याने पुढच्या मोहिमा यशस्वी झाल्या. त्यांचे संदर्भ पुस्तकात येतात. त्यामुळे अपयशदेखील मार्गदर्शक असू शकते हे पटू लागते. जसे की भारतात सर्वप्रथम येणारा वास्को द गामा ठाऊक होता पण त्याच्या या प्रवेशाची नांदी करणारा पेड्रो दि कोविला ठाऊक नव्हता.

पुस्तकाचे मुखपृष्ठ आपल्याला तिथे काही क्षण खिळवून ठेवते. मुखपृष्ठाची रंगसंगती, निळ्या रंगाच्या समुद्रात फिरणारे काळे शिडाचे गलबत असे अगदी साधे चित्र आहे. पण फारच सयुक्तिक आहे. डॉक्टरांचे साध्या भाषेतील आणि मनाला भिडणारे मनोगत आवडले. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला त्यांनी योजलेले सुविचार तर मी प्रकरण संपल्यावरदेखील पुन्हापुन्हा वाचले. लेखकाने ते विचार किती अभ्यासाने आणि विचारीपणे घेतलेले आहेत ते या वारंवार वाचण्याने लक्षात आले. ज्यांचा इतिहास-भूगोल हा अभ्यासाचा विषय असेल त्यांच्यासाठी कदाचित


हे पुस्तक आहे... सुमारे साडेचार अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या पृथ्वीच्या अंतरंगाविषयीचं! तिच्या आजतागायत सुरू असलेल्या बदलांच्या आणि त्याला कारणीभूत असलेल्या घटकांच्या रंजक आणि सुबोध पद्धतीनं केलेल्या शास्त्रीय मांडणीचं...! तेव्हा जरूर वाचा...



**शोध बदलत्या पृथ्वीचा**

सतत बदलत्या भूगर्भीय घडामोडींचा वेध

सुनीत पोतनीस

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

हे पुस्तक प्राथमिक असेल पण माझ्यासारख्या भूगोलात गोल असणाऱ्या आणि इतिहास हा विषय केव्हाच इतिहासजमा झालेल्या लोकांसाठी मात्र एकत्रित पद्धतीने केलेले भूगोल इतिहासाचे महत्त्वाचे संकलन आहे. काळाचा खूप मोठा पट त्यात उलगडला आहे.

एकच गोष्ट जाणवली, ती म्हणजे इतिहास या विषयाचा फार अभ्यास नसल्याने कित्येक राजवटींचे आलेले संदर्भ त्रोटक वाटतात. अर्थात प्रत्येक राजवटीचा इतिहास पुस्तकात नमूद करणे शक्य नाही अथवा पुस्तकाचा मूळ उद्देश बदलेल. त्यामुळे हा दोष लेखकापेक्षा वाचकाचा जास्त आहे. एकेका सफरीवर एकेक पुस्तक लिहिता येईल एवढा ऐवज पुस्तकात आहे. तो अजून रंजक असता तर चालले असते असे वाटले. काही ठिकाणी पुस्तक रुक्षतेकडे वळण्याचा धोका त्यामुळे वाटतो. पण पुस्तकाला गोष्टींचे पुस्तक न बनवता शोधयात्रींचा दस्तऐवज असेच स्वरूप असावे हा लेखकांचा विचार ठाम होता, हे त्यांच्याशी फोनवर बोलल्यावर लक्षात आले. जगाच्या सागरी सफरींचा, शोधांचा सारांश समजावून सांगणारी ही शोधयात्रा मला फार स्पृहणीय वाटली. त्या काळी भूगोल, पृथ्वी यांबद्दल असणारे एकंदर गैरसमज वाचून तर गंमतच वाटली.

अत्यंत कमी कालावधीत पुस्तकाची सुधारित आवृत्ती बाजारात दाखल होणे, पुस्तकाला कित्येक पुरस्कार मिळणे हे लेखकांच्या अथक अभ्यासाचे फलित. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. पण एकच विनंती, एवढ्यावरच डॉक्टरांनी थांबू नये. त्यांना ज्या ज्या विषयात गती आहे ते ते विषय असेच सोपे करून त्यांनी आमच्यासमोर ठेवावेत.

***सारिका कुलकर्णी***
९९३०८७९०९८




धरण बांधलं ही एक गोष्ट, फुटलं ती दुसरी!
दोन्हीमुळे गावकऱ्यांच्या जगण्याला
भलत्याच वाटा फुटल्या.
धरणामुळे गावगाडा कसा बदलत जातो,
हे चित्रित करणारी कादंबरी...

**धरणकळा**

ल. म. कडू

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# नेहरू : नवभारताचे शिल्पकार

*पं. जवाहरलाल नेहरू यांना १९५५ साली 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले. एम. जे. अकबर लिखित व करुणा गोखले अनुवादित 'नेहरू : नवभारताचे शिल्पकार' हे पुस्तक 'राजहंस'ने प्रकाशित केले. त्यातील 'तुरुंग – सर्वांत अभिनव शाळा' या प्रकरणातील हा संपादित अंश.*

## तुरुंग – सर्वांत अभिनव शाळा

तुरुंगातील सक्तीच्या निष्क्रियतेचे जवाहरलालांना फारच वैषम्य वाटत होते. त्यांनी ३ ऑक्टोबर रोजी इंदिरेला लिहिलेल्या पत्रात ते स्पष्टपणे प्रतिबिंबित होते. जवाहरलालांनी तिला लिहिले :

'चला, सनसनाटी अनुभवणं खूप झालं. बापू आंब्याखालचा डेरा हलवून पुनश्च तुरुंगात जाणार आणि बाईसाहेब तुम्ही शाळेला जायचं. आणि मी काय करायचं? मी आहे तिथेच राहणार. वाचणार, लिहिणार आणि शीर्षासन करणार.' त्या वेळेपर्यंत जवाहरलाल योगनिपुण झाले होते. बऱ्याच वेळा त्यांना नैराश्य घेरून टाकायचे :

'कशी वर्षांमागून वर्षे मी तुरुंगात एकट्याने बसून काढली आहेत! स्वत:च्याच विचारांत बुडालेला, बाहेर ऋतूमागून ऋतू सरकत आहेत, एका पाठोपाठ एक काल पटलावरून लुप्त होत आहेत. किती वेळा चंद्र कलेकलेने वाढत गेलेला, पुनश्च खंगत खंगत नाहीसा झालेला बघितला आहे. झगझगते तारकामंडल आकाशाच्या वाळवंटात दिमाखाने मार्गक्रमणा करताना पाहिले आहे. माझ्या तारुण्यातील किती दिवस या तुरुंगात गाडले गेले आहेत! कधी कधी त्यांच्या ढिगाऱ्यातून या गतप्राण दिवसांची भुते उठून माझ्या भोवती गोळा होतात, जुन्या आठवणी छेडतात आणि दबक्या आवाजात मला विचारू लागतात, हा सगळा त्रास काढणे सयुक्तिक होते का?'

तुरुंगाबाहेर हा त्रास सयुक्तिकच वाटतो, परंतु तुरुंगाच्या आत आल्यावर सगळ्याच गोष्टी निराळ्या वाटू लागतात. त्यांच्या रोजनिशीतील रविवार ४ सप्टेंबरची नोंद होती :

‘अखेरीस ऑगस्ट महिना कसाबसा संपवलाच. पण त्यासाठी दोन अगदी सामान्य उर्दू काव्यपंक्ती लिहिल्या आहेत :

*सुबह होती है, शाम होती है,*
*जिंदगी यूँही तमाम होती है ।’*

याच माणसाने पाच वर्षांपूर्वी आपला प्रिय मित्र सईद महमूदला प्रश्न केला होता, की तो उर्दू काव्याच्या भावूक खुळचटपणात एवढा का गुंतून पडतो?

या सगळ्यातून सुटण्याचा एकच मार्ग होता, तो म्हणजे जे आहे, ते निमूटपणे स्वीकारणे. ‘काय पण आयुष्य आहे! दिवसामागून दिवस चालले आहेत; रहाटगाडग्यासारखे! प्रत्येक नवा दिवस आधीच्याच दिवसाचा चेहरा घेऊन उगवतो. दोन्हींमध्ये तसूभरही फरक नाही. आणि पुस्तके! पुस्तके नसतील, तर कंटाळा आणि नैराश्यावर मात तरी कशी करायची?’ अर्थात जवाहरलालांवर लादलेल्या निष्क्रियतेचे आणि रटाळ दिनक्रमाचे नंतरच्या पिढ्यांनी आभारच मानले पाहिजेत. जवाहरलालांची पुस्तकांची भूक म्हणजे एक आख्यायिकाच होती. त्याविषयीचा एक संदर्भ वारंवार उद्‌धृत होतो. १४ फेब्रुवारी १९२९ रोजी जवाहरलालांनी लंडनच्या ‘द टाइम्स बुक क्लब’कडे एकोणपन्नास पुस्तकांची मागणी नोंदवली. त्यात विज्ञान, तंत्रज्ञान, राजकारण, इतिहास या विषयांपासून ते चरित्र, आत्मचरित्र, भारतीय महाकाव्ये या सर्व विषयांवरील पुस्तकांचा समावेश होता. तुरुंगात त्यांनी अर्नोल्ड टॉइन्बी, हॅरॉल्ड लास्की, ज्यूलियन हक्सली आणि टागोर यांचे साहित्य वाचण्यास सुरुवात केली. ‘न्यू स्टेट्‌समन’ आणि ‘द स्पेक्टॅटर’ ही त्यांची आवडती ब्रिटिश वृत्तपत्रे होती.

तुरुंगवास ही एक प्रकारे कामापासून सक्तीची सुट्टी होती. एकदा तुरुंगात जाताना रस्त्यात ते कृष्णाची समजूत काढत होते. त्या वेळी त्यांनी तुरुंगाचे वर्णन ‘जगातील सर्वांत आगळेवेगळे विद्यापीठ’ असे केले होते. या विद्यापीठात त्यांनी भरपूर लेखन-वाचन केले. त्यांच्या तीन अभिजात ग्रंथांचे श्रेय त्यांच्या तुरुंगवासाला जाते. ‘ग्लिम्प्सेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री’ (१९३४-३५), ‘ॲन ऑटोबायोग्राफी’ आणि ‘द डिस्कव्हरी ऑफ इंडिया’ (१९४६).

‘ग्लिम्प्सेस’ ही जवाहरलालांसारख्या कायम पायांना चाके लावून फिरणाऱ्या पित्याची आपल्या मुलीला दिलेली सर्वोत्तम भेट होती. इंदिराच्या तेराव्या वाढदिवसाला जवाहरलालांनी लिहिले : ‘मी तुला कुठलीही जड वस्तू भेट म्हणून देऊ शकत नाही. माझी भेट भावनिक, आत्मिक अशा अस्पर्श स्वरूपाचीच असू शकते. एखाद्या परीने आकाशातून येऊन द्यावी अशी. तुरुंगाच्या उंचच उंच भिंतीसुद्धा जिला अडवू शकणार नाहीत अशी. वायुमार्गाने पाठवता येण्याजोगी.’ जवाहरलालांनी गंमत म्हणून इंदिरेस पत्रे लिहायला सुरुवात केली. परंतु तिला ती आवडत आहेत असे कळल्यावर ते नियमितपणे लिहू लागले. या पत्रांतून आश्चर्यकारक असा मानवी संस्कृतीचा

इतिहासपटच तयार झाला. (जवाहर लिहिताना कुठलेही संदर्भग्रंथ वापरत नव्हते, त्यामुळे ही पत्रे म्हणजे खरोखरच आश्चर्य म्हणायला हवे.) या पत्रांमधून जवाहरलाल यांनी मानवी अनुभवांच्या परिचित व अपरिचित अशा डोहांमध्ये बुडी घेतली होती. कालपटावर घडून गेलेल्या घटना व त्यांचे जवाहरलालांच्या आणि संस्कृतीच्या मन:पटलावर पडलेले छाप यांचे एक मनोहारी कोलाज तयार केले होते. एका कुमारवयीन मुलीच्या, नव्या ज्ञानासाठी सदैव आसुसलेल्या मनास आकर्षित करण्याची जबरदस्त ताकद या पत्रांमध्ये आहे. त्यांच्या लेखनातून जवाहरलालांना बंदिवासातही बौद्धिक मुक्ततेचा आनंद मिळाला. १९ मे १९३२ रोजी त्यांनी लिहिले :

‘इतिहासाच्या जंजाळातून भ्रमंती करायची तर मी तुझ्यासाठी फारसा योग्य वाटाड्या नाही, कारण इतिहासाच्या जाळ्यात मीच अनेकदा वाट चुकतो. असे असताना मी तुला अचूक मार्गदर्शन कसे करणार, असा विचार अनेकदा माझ्या मनात येतो. पण मग नंतर माझे मलाच वाटू लागते, की माझी थोडीफार मदत होऊ शकेल आणि मी पत्र लिहिणे सुरूच ठेवतो. अर्थात या पत्रांचा मला स्वत:ला खूपच फायदा होतो. या माझ्या खोलीतील तापमान ११२ अंश फॅरनहीट आहे, बाहेर उष्ण वारे वाहत आहेत, पण माझ्या ते लक्षातही येत नाही. कधी कधी तर आपण बरेलीच्या जिल्हा कारावासात आहोत, हेपण मी विसरून जातो. मागच्या पत्रात मी तुला पार चौदाव्या शतकातील मलेशियाची सफर घडवली. पण उत्तर हिंदुस्तानाच्या बाबतीत मात्र अजून हर्षराजाच्या पुढेही सरकलेलो नाही.’

जवाहरलालांनी सावधगिरी बाळगलीच, तर ती फक्त भारतीय स्वातंत्र्यलढा आणि वसाहतवादविरोधी पूर्वग्रह यांच्या बाबतीत. जी मुलगी पुढे जाऊन स्वत:च पंतप्रधान बनणार होती, तिच्यासाठी हे चांगलेच घडले.


देशासाठी भरीव कार्य करणाऱ्या पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी
केलेल्या काही चुका त्यांच्यावर अलोट प्रेम करणारी जनताही
नजरेआड करू शकत नाही. अनेक रसायनांच्या मिश्रणाने
बनलेल्या या नवभारताच्या शिल्पकाराचे
एम. जे. अकबर लिखित चरित्र आता मराठीत.



**नेहरू**

नवभारताचे शिल्पकार

एम. जे. अकबर । अनुवाद : करुणा गोखले

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

१९३४च्या जून महिन्यात स्वत:चा आंतरिक धांडोळा घेण्याची लहर आली आणि जवाहरलालांनी स्वत:चीच जीवनकहाणी लिहिण्यास प्रारंभ केला. सुरुवातीस आपल्या आत्मकथनास त्यांनी 'इन अॅण्ड आऊट ऑफ प्रिझन' असे शीर्षक दिले होते. परंतु ती केवळ 'ॲन ऑटोबायोग्राफी' अशा नावाने प्रसिद्ध केली. या आत्मकथनात आपण इतिहासाचा नाही, तर स्वत:च्या मानसिक वाढीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी म्हटले होते. १९३६मध्ये ती प्रकाशित झाल्यानंतर तिचे 'उन्नत, आधुनिक अंतरंगाचे यथार्थ दर्शन घडवणारी साहित्यकृती' म्हणून खूप कौतुक झाले.

❖


भारताच्या अमृतमहोत्सवी कामगिरीचा आलेख!
काय कमावलं, कसं मिळवलं यांचा धावता पण विस्तृत
लेखाजोखा मांडणारा हा ग्रंथ. जिथे जिथे यशाच्या
पाऊलखुणा उमटल्या, अशा एक-दोन नव्हे,
तर ७५ यशोगाथांचा सचित्र मागोवा.



**७५ सोनेरी पाने**

अविनाश धर्माधिकारी

आवृत्ती सातवी (जन आवृत्ती)
किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ८०)




आधुनिक भारताच्या जडणघडणीत मोलाचे योगदान
देणारे हे दोन लोकोत्तर नेते. हे दोन्ही महापुरुष दोन ध्रुवांसारखे
लांब आहेत, असे वाटते; तथापि त्यांचे शाश्वत
संदेश लक्षात घेऊन त्यांमध्ये सुसंवाद कसा
साधता येईल, याचा हा प्रामाणिक प्रयत्न.

**महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर : संघर्ष आणि समन्वय**

नामदेव कांबळे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

*हजारो वर्षांच्या परंपरेचं पाथेय आपल्या अक्षर वाङ्मयातून पुढील पिढ्यांना देणारी, संस्कारशील असूनही आपलं स्वयंभूपण आणि मूलकंद जपणारी आपली मातृभाषा मराठी अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर या वर्षी घटस्थापनेच्या मुहूर्तावर अभिजात भाषांच्या पंक्तीत विराजमान झाली आहे. मायमराठीच्या समृद्ध ठेव्यातील भाषेची सौंदर्यस्थळे व सामर्थ्यस्थळे अंशरूपाने वाचकांसमोर ठेवणारे हे सदर. अखेर 'पिंडी ते ब्रह्मांडी...'*

*मुंबई येथे भांगवाडी नाट्यगृहात ता. ७ सप्टेंबर, १९०६ रोजी 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'चा आठवा वार्षिक समारंभ लो. टिळकांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला होता. त्या वेळी त्यांनी केलेले हे भाषण आपल्या मराठी भाषासौंदर्याचा व तत्कालीन भाषारूपाचा एक उत्तम नमुना आहे.*

## स्वभाषेची अभिवृद्धी : साहित्यिक बाळ गंगाधर टिळक

मराठी भाषा गरीब आहे व ती जगातील सुसंस्कृत, सुधारलेल्या व वाढलेल्या भाषांच्या बरोबरीस बसण्यास आज तयार नाहीं, हे जरी खरें असले तरी, आपली ती भाषा आहे. बरे-वाईट, ग्राह्यग्राह्य वगैरेंसंबंधाचा विचार जरी व्यावहारिक असला, तरी स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म ह्यांस हा व्यवहाराचा नियम लागू नाही. मराठी ही आमची भाषा आहे. आमचे वाडवडील ती बोलत आले, त्या भाषेतच आमचा जन्म झाला, म्हणून ती चांगली अगर वाईट हा विचार आम्हांस नाहीं. जन्माबरोबर उत्पन्न झालेल्या गोष्टींपैकीं भाषा ही आहे. वरील गोष्टींवरून स्वभाषे बद्दल कळकळ का असावी, ह्याचे उत्तर देणे कठीण नाही.

भाषेची अभिवृद्धी लोकांच्या व राष्ट्राच्या अभिवृद्धिवर अवलंबून असते. भाषा ही कृत्रीम इलाजांनी सुधारत नाही. मुंबई इलाख्यातील निम्मे लोक मराठी बोलतात. ह्याखेरीज वऱ्हाड, नागपूर व निजामशाही घेतली तर सर्व हिंदुस्थानांत आज दोन कोटी लोक मराठी बोलणारे आहेत. इतक्यांची ही मराठी भाषा बुडून तिच्या जागीं दुसरी

भाषा येणे शक्य नाहीं. इंग्रजी भाषा खेडेगांवांत जरी गेली तरी मराठी बुडत नाही, मराठी बोलणाऱ्या दोन कोटी लोकांची उन्नती व्हावी, त्यांस आपले विचार कळवावे असे जर तुम्हांस वाटत असेल तर मराठी भाषा वाढवा. पेशवाईत मराठीस मान होता तो आतां नाहीं. तेव्हां लष्कराची, व्यापाराची भाषा मराठी होती. परंतु देशाच्या राज्यसत्तेच्या स्थित्यंतरामुळें मराठीचे स्थित्यंतर झाले आहे. तेव्हां मराठी भाषेच्या अभिवृद्धिचा विचार करावयाचा त्याबरोबर पालटलेल्या राजकीय स्थितीचाहि विचार केला पाहिजे. हल्लींच्या परिस्थितीच्या मानानेंच मराठीची उन्नती होणार. इंग्रजीची स्थिती मराठीस यावयास वेळ लागेल. आपला अभ्युदय झाला तर मराठीचा अभ्युदय होईल, अशा रीतीने दोहोंची सांगड आहे. आज आपणांस आपले विचार परकी भाषेंत प्रगट करण्याची संवय झाली आहे. धर्मासबंधानेंहि विचार प्रगट करावयाचे तर ते आपण इंग्रजीतच करतों. मराठी भाषेची पूर्ण वाढ राष्ट्राच्या उन्नतीवर आहे हे जरी खरे, तरी विपन्न स्थितीतही आपण उद्योग केले पाहिजेत. निबंधमालेतील पहिला निबंध 'मराठी भाषेची स्थिती' हा होता. त्याच्या प्रारंभीच्या अवतरणांत सांगीतल्याप्रमाणे आतांचा विपन्न स्थितीतला उद्योग अधिक श्रेयस्कर आहे, व राष्ट्रास भूषणावह आहे. मराठी भाषेस आज राज्यासनावरून दूर केले आहे. दरबारांत तिला बंदी आली आहे. विद्यापीठांतून तिला अर्धचंद्र मिळाला आहे व व्यापारांतहि ती नाही. तरीही अशा ह्या कलांत तिची अभिवृद्धी होईल अशी चिन्हे दिसत आहेत. इंग्रजीची व मराठीची भेट झाली हे एका प्रकारे सुचिन्ह होय. हल्लीच्या परिस्थितीप्रमाणे मराठीस जरी संकुचित व्हावें लागले तरी ज्ञानाच्या दृष्टीने तिची वाढ होईल हे खचित. इंग्रजी वाङ्मय चांगले व त्यानेंच मला सुख होत आहे, दुसऱ्याची मला जरूर नाहीं, अशा समजुतीने मराठीची वाढ होणे शक्य नाहीं. मराठीची वाढ करणें आपल्या हातीं आहे. 'युनिव्हर्सिटीत मराठी नको' असे म्हणणारा मी नाहीं. परंत 'युनिव्हर्सिटीत एकदां मराठी घेतली म्हणजे गेली म्हणजे आपले कर्तव्य संपलें' असे मानता येत नाहीं. इतक्याने भाषेची अभिवृद्धी होत नाही. भाषा वाढावयास राष्ट्रांतील सर्व व्यवहार त्याच भाषेंत झाले पाहिजेत. इतर भाषेंतील ज्ञान त्या भाषेत उतरले पाहिजे, व हे काम करण्याबद्दल विद्वानांत उत्कट इच्छा पाहिजे; महाराष्ट्रांतील साधू-संतांनी मराठी भाषा वाढविली. संस्कृतांतील ज्ञान मराठींत आणण्याचे काम त्यांस करावयाचे होते; त्याबरोबरच भाषावृद्धीचे काम झालें. एकमेकांचे विचार एकमेकांस कळविण्याचे साधन भाषा होय. तुम्ही-आम्ही भाषा बोलणारे एकत्र येऊन त्यांचा व्यवहार अधिक झाला पाहिजे. भाषावाढीची इच्छा पाहिजे व भाषेबद्दल कळकळ पाहिजे. नुसत्या भाषांतराने अगर नाटकांच्या रूपांतराने भाषावृद्धीचे काम भागात नाहीं. अंतःकरणपूर्वक काम झाले पाहिजे. मनांत कळकळ नसतां व वरकांती कितीहि उद्योग केला तरी कांही अर्थ नाहीं. भाषेच्या अभिवृद्धीसाठी यत्न करावयाचे तेव्हां देशांतील लोकांची कळकळ वाढते किंवा नाहीं, हे पाहिले पाहिजे व तें पहाण्याचे माप निराळें आहे. मासिक-

पुस्तकें वगैरेंनी तें समजणार नाहीं. इंग्रजी अमदानींत मराठीच्या गद्य-ग्रंथांची चांगली वाढ झाली आहे.

आजचे सुशिक्षित परकी भाषा बोलत आहेत. मराठींत इंग्रजी शब्द जसेच्या तसे आले तर भाषा वाढेल, पण ज्ञानवृद्धी होणें नाहीं. आईचे पोर दाईच्या दुधावर वाढले तर त्यास आईची पर्वा राहत नाहीं. तशी आमची स्थिती होता कामा नये. पण परिस्थिती तशीच आहे व ह्या परिस्थितीस आळा घालणें फार प्रयासाचें, दगदगीचे व खटपटीचे आहे. मराठी भाषेच्या अभिवृद्धीस सुशिक्षितांची कळकळ हे मुख्य साधन आहे. भाषांतर करणें अगर ट-ला ट व प- ला प अशा कवितेने भाषेची अभिवृद्धी नाहीं. भाषेमध्ये जीव पाहिजे असेल तर ती बोलणाऱ्यामध्ये जीव पाहिजे. राष्ट्रांत लोकांच्या मनाची वाढ होते त्या वेळीं इतिहासकार कादंबरीकार वगैरे सर्व उत्तम निपजतात.

देशी भाषेंत शिक्षण दिले पाहिजे हे स्वदेशिनेम समजलें. मराठी हि आपली भाषा आहे, मला ह्या भाषेत काम करणें आहे, ह्या भाषेशिवाय दुसरें साधन नाहीं, अशी प्रत्येकाची भावना झाली तर मराठीची वाढ हां हां म्हणतां होईल. मराठीत ग्रंथसंग्रह वाढविणे, लोकांत वाचनाची अभिवृद्धी होणें, आपल्या बांधवांस मराठीत ज्ञान सांगण्याचा धंदा करणें, ह्या भाषावृद्धीस आवश्यक गोष्टी आहेत. सुशीक्षितवर्गाने इंग्रजीत मिळविलेले ज्ञान देशी भाषेत द्यावें, हा इंग्रजी शिकण्याचा हेतु आज अजीबात बाजूला राहिलेला आहे. स्वभाषा, स्वदेश, स्वधर्म ह्यासंबंधाने जन्मत:च आम्ही ऋण घेऊन आलों आहों. ते फेडण्याचा यत्न प्रत्येकाने केला पाहिजे. असा यत्न केला नाहीं तर भाषा मृतभाषा होईल. भाषा मेली म्हणजे विचार मेले व जवळ जवळ तो राष्ट्रीय मृत्यूच समाजाला पाहिजे. तरी महाराष्ट्रास मराठी नको असे नाही. एका भाषेच्या सबबीवर स्वभाषा, स्वधर्म व स्वदेश ह्यांस विसरू नका. ग्रंथसंग्रहालय हे वाङ्मयाचे प्रदर्शन होय. ह्या ग्रंथप्रदर्शनांत खूप प्रदर्शन-वस्तू म्हणजे ग्रंथ हवेत. भाषेंत ग्रंथ अधिक तितकी भाषेची योग्यता अधिक तेव्हां भाषेस योग्यता आणण्याची बुद्धी परमेश्वर सुशीक्षितांस देवो.''

❖

१८९८ ते १९०८ हा लोकमान्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा माध्यान्हकाळ! आधी ते नामदार टिळक होते, नंतर ते 'लोकमान्य' झाले. त्यांच्या लोकमान्यत्वाच्या पैलूंचा वेध!

अष्टावधानी लोकमान्य

अरविंद व्यं. गोखले

किंमत : ₹ २७५/- । (ट.ख. ₹ ५०)



## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके



ही कहाणी आहे आजच्या काळाची, वर्तमानातील व्यक्ती आणि जनमानसाची! सई आणि रोहन या व्यक्तिरेखांच्या रूपाने समस्यांची गुंतागुंत उलगडत वाचकांनाही जीवनाचा वेध घेण्यास, वास्तविकतेचे रंग डोळसपणे पाहण्यास प्रवृत्त करणारी ही कादंबरी...

### वास्तविकतेचे रंग

दिलीप फडके

किंमत : ₹ ३४०/- । (ट.ख. ₹ ५०)




सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

### सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)




मृत्यू समीप असतानाही जगावेगळा विचार करणाऱ्या व्यक्तींच्या या आहेत असामान्य जीवनस्पर्शी आणि वास्तवदर्शी कथा... यांतील प्रसंग, गूढता, ताणतणाव आणि दिलासा देणारा हळुवार स्पर्श वाचकांना मनभावन होईल.

### सोबत सांजवेळची

डॉ. प्रियदर्शिनी कुलकर्णी । अनु. : पद्मजा मेहेंदळे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

# असे जन्मले पुस्तक

## वस्त्रगाथा

*हा आहे वस्त्रसंस्कृतीच्या अंतरंगाचा संशोधक वृत्तीने,*
*कलात्मकतेने आणि सांस्कृतिक-ऐतिहासिक संदर्भांसह घडविलेला*
*व्यापक आणि चित्रमय प्रवास...*

'वस्त्रगाथा'ची जन्मकथा अगदी रोचक आहे. या संशोधनकार्याची सुरुवात एखादा वेधक विषय घेऊन अभ्यास करावा, अशा प्रकारे झाली नाही, तर माझ्या उत्सुकतेपोटी झाली. मी बनवलेल्या साड्यांची प्रदर्शने मी देशभर करत होतो. या प्रदर्शनांमधून मला देशातील जवळपास सर्व प्रांतांमधील पारंपरिक वस्त्रांचे प्रतिनिधित्व दिसून येत होते. अपवाद होता महाराष्ट्राचा. असे का होत असावे असा मला प्रश्न पडत होता. महाराष्ट्रात आता पारंपरिक वस्त्रे, साड्या फारशा विणल्या जात नाहीत, असे माझ्या लक्षात येऊ लागले. मग मला प्रश्न पडायला लागला की महाराष्ट्रात कोणत्या साड्या विणल्या जात होत्या, त्या कुठे विणल्या जात होत्या, त्यांचे स्वरूप काय होते, त्यांची ऐतिहासिकता काय होती, वगैरे.

आपल्या पारंपरिक वस्त्रांची माहिती करून घेण्यासाठी मला मराठीत या विषयांवरची पुस्तके काही सापडत नव्हती. इंग्रजीमध्ये काही पुस्तकांमधून माहिती मिळत होती, परंतु सखोल अशी माहिती त्यात नव्हती. या पुस्तकांमध्ये सहसा ब्रिटिश अभ्यासकांच्या दस्तऐवजीकरणावर बेतलेली माहिती मिळते. ब्रिटिशांनी हे दस्तऐवजीकरण त्यांच्या त्रयस्थ नजरेने केले आहे. त्यांचे उद्देशही वेगळे होते. अगदी थोड्या भारतीय अभ्यासकांनी मुळातून माहिती घेऊन ती मांडायचा प्रयत्न केला आहे. पण अमराठी असल्यामुळे त्यांना इथल्या वस्त्र-संस्कृतीच्या अंतरंगात शिरता आले नसावे.




किंमत : ₹ ९००/- । (ट.ख. ₹ ५०)

अशा बाबींमुळे मला हा अभ्यास मुळातूनच करावा लागणार, हे लक्षात

आले. असा अभ्यास करताना लागणारी संशोधकवृत्ती अंगी बाणवायला कारणीभूत असणारी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझे कायद्याचे शिक्षण. बेंगलोरच्या नॅशनल लॉ स्कूलमध्ये विधी प्रावीण्याचा म्हणजे, विधी शिक्षणात मास्टर्स करताना तिथे मिळालेले संशोधनाबद्दलचे प्रशिक्षण व शिस्त यामुळे मला हा अभ्यास नीटपणे करता आला.

माझ्या संशोधनकामात पुस्तकांतून मिळालेली माहिती, मराठी काव्यपरंपरांमधून मिळालेले संदर्भ, या संदर्भांचा घेतलेला मागोवा, हे जसे महत्त्वाचे आहेत, तसेच, आम्ही गावोगावी फिरून जमा केलेले वस्त्रांचे नमुने, विणकर, जुने दुकानदार, काही जाणकार यांच्याकडून मिळालेली माहिती, हे सर्वही अत्यंत महत्त्वाचे आहे.

एका पुस्तकातून दुसऱ्या पुस्तकाचा संदर्भ सापडतो व त्याची शृंखला तयार होते. ती पुस्तके मिळवायला आपण धडपडतो. तसेच कुणाकडून जरा काही माहिती मिळली की अमुक गावात याबद्दल काही सापडू शकेल, आम्ही तडक तिकडे जायला निघतो. त्या-त्या गावात जाऊन ओळखी काढून संबंधित लोकांपर्यंत पोहोचणे, यामध्ये अतिशय रंजक अनुभवही येत राहतात. त्यांपैकी काही अनुभवही मी 'वस्त्रगाथा'मध्ये मांडले आहेत.

माझ्या कामाच्या अशा स्वरूपामुळे संशोधनाच्या विविध पद्धतींचा अवलंब मला करावा लागला. प्रत्येक पद्धतीमध्ये पाळावे लागणारे निरनिराळे दंडक पाळण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला आहे. मिळालेल्या माहितीच्या स्रोताबद्दल पाळावी लागणारी पारदर्शकता, मिळालेल्या माहितीची खातरजमा, त्याचे सम्यक पृथक्करण, प्राथमिक सोबत दुय्यम स्रोतांचाही उल्लेख अशासारखी तत्त्वे पाळण्याचा मी कसोशीने प्रयत्न केला आहे. या संशोधनातील काही उदाहरणे आपल्यासमोर मांडतो.

माझ्या संशोधनाची प्रक्रिया व फलित ललित पद्धतीने मांडण्याचा माझा प्रयत्न





जनजीवनाशी अतूटपणे एकरूप झालेल्या या वस्त्रधाग्यांच्या मोहक प्रतिमा साहित्याच्या कथाकाव्यातून, चित्र-शिल्पांच्या रंगरेषांमधूनही उमटल्या. एका हुन्नरी कलाकाराने, व्यासंगी अभ्यासकाने आणि जाणकार तज्ज्ञाने विविधांगांनी घेतलेला एका वस्त्रसंस्कृतीचा वेध...

**वस्त्रगाथा**

विनय नारकर

किंमत : ₹ ९००/- । सवलतीत किंमत : ₹ ६००/-
(ट.ख. ₹ ५०)

राहिला आहे. परंतु जेथे शक्य आहे तेथे, इथेच न थांबता सापडलेल्या वस्त्रप्रकाराची, म्हणजेच साडीची प्रत्यक्ष निर्मिती करण्याकडे माझा ओढा असतो. त्यासाठी संशोधन सर्वांगीण होणे गरजेचे असते. अशाच संशोधनप्रवासापैकी एक आहे 'जोठ' साडीचा प्रवास. एका लोकगीतामधून सापडलेल्या या शब्दाचा वेध घेताना या साडीचे स्वरूप, विणली जाणारी पेठ, ऐतिहासिक महत्त्व, विणायचे तंत्र, ही परंपरा संपुष्टात येण्याचा काळ, त्याची कारणे अशी माहिती घेत या साडीचा नमुना मिळवणे, त्याच्या मूळ विणकरापर्यंत पोहोचणे, ते ही साडी प्रत्यक्ष विणणे इथपर्यंत झाला.

या संशोधनादरम्यान मला वस्त्र-संस्कृतीशी संबंधित अनेक शब्दांचा शोध लागला. विणकाम व वस्त्रसंस्कृती लयाला जात असल्याने हे शब्दही वापरातून बाहेर पडले आहेत. निरनिराळ्या प्रकारची काव्ये वाचताना, विणकामाशी संबंधित लोकांशी बोलताना, वस्त्रांसंबंधी म्हणी आणि वाक्प्रचार शोधताना असे अनेक शब्द सापडत गेले. सापडलेल्या शब्दांचा अर्थ शोधता येतो, पण माहीतच नसलेल्या शब्दांचे काय? त्यासाठी मग मी काही शब्दकोश वाचून काढले. असाच एक शब्द आहे 'फुटा'. या शब्दांचा अर्थ निर्णयन करताना महत्त्वाचे शब्दकोश, अभ्यासक, इतकेच काय दस्तूरखुद्द इतिहासाचार्य राजवाडे यांचा गोंधळ उडालेला दिसून येतो. मला सापडलेला याचा अर्थ आहे, शेला. हा अर्थ लावला की लीळाचरित्रापासून अन्य साहित्यकृतींत जिथे हा शब्द आला आहे तिथे अर्थ निर्णयन पूर्ण होते.

मराठी काव्य-परंपरेमध्ये द्रौपदीवस्त्रहरणाच्या काव्याची एक विलक्षण परंपरा आहे. मराठी कवी महाभारतातील काही प्रसंगांवर काव्य रचत असताना जिथे द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग सुरू होतो तिथे एक चमत्कृती दाखवतात. या अत्यंत उद्विग्न करणाऱ्या प्रसंगाचे वर्णन करताना ज्या वेळी दु:शासन द्रौपदीच्या साडीला हात घालतो, तिथपासून ते काव्य वेगळेच वळण घेते. या प्रसंगाचे गांभीर्य विसरून कवी तिथे श्रीकृष्णाने द्रौपदीला पुरवलेल्या साड्यांची नावे घेऊन त्यांची वर्णने सुरू



करतो. अशा काव्याची एक मोठी परंपराच मराठीत पाहायला मिळते. संत, पंत, तंत व लोकसाहित्य अशा सर्व परंपरांमध्ये अशी काव्ये दिसून येतात. या परंपरेचे जनकत्व जाते चौदाव्या शतकातील कवी नामा पाठक यांच्याकडे. त्यांचे एक हस्तलिखित तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयात आहे, त्यात हे काव्य आहे. यानिमित्ताने कालौघात मागे पडलेल्या या महत्त्वाच्या कवीचे स्मरण व्हावे, हा एक आनंदयोग आहे.

***विनय नारकर***

९८९०६१५७६७

## ‘राजहंसी’ विविधा



माणसात लपलेल्या हिंस्रतेचे
अनेकविध पदर उलगडून दाखवणारा,
त्याच्यातल्या माणूसपणाचेही दर्शन घडवणारा

### युद्धानंतर...

आदित्य दवणे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



पृथ्वीवरील खनिजसंपत्ती वाहून नेण्याचे व्यापारी मार्ग फक्त
युरोप-अमेरिकेच्या ताब्यात हवेत, ही आजची अटीतटी
मोठी आहे. त्यासाठी पाश्चात्त्य सांस्कृतिक संस्था,
गुप्तचर यंत्रणा आणि शस्त्रलॉबी एकत्र काम करतात.
व्यापारी मार्गावरील देशांना मांडलिक बनवण्याच्या
नादात युद्धाचे वणवे पेटवून देतात.
मध्यपूर्वेतील अशा युद्धकहराची ही गोष्ट!

### वावटळ पेराल, तर वादळच उगवेल!

मिशाएल ल्यूडर्स । अनु : वैशाली करमरकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)



जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या
एका कलंदराचं चरित्र. आयुष्यभर
असंघटित अरबांच्या हक्कांसाठी लढणारा!
अरबांना मुक्ती मिळवून देणाऱ्या
त्या अवलिया लढवय्याची अद्‌भुत कहाणी...

### लॉरेन्स ऑफ अरेबिया

यशवंत रांजणकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)

# आठवणींचा पारिजात

## राहून गेलेली भेट...

'नंदनवन' या आकाराने लहान पण कलागुणांच्या दृष्टीने उत्तम असणाऱ्या माधव वझे यांच्या बालनाट्यकृतीसंदर्भातली ही एक हृद्य आठवण.

थोर लेखक वि. वा. शिरवाडकर यांची 'अंतराळ' ही दीर्घकथा 'महाराष्ट्र टाइम्स'च्या १९७८च्या दिवाळी अंकात प्रकाशित झाली, ती कथा माधव वझे यांच्या वाचनात आली आणि त्यांच्यातील रंगकर्मी जागृत झाला. त्यांनी या कथेतून प्रेरणा घेऊन 'नंदनवन' नावाची संगीत-नृत्य-नाट्य रंगसंहिता बालकुमार रंगभूमीसाठी तयार केली. या नाटिकेचे प्रयोग १९८२-८४मध्ये कधीतरी पुणे-मुंबई या ठिकाणी वझेसरांच्याच 'जागर' या प्रायोगिक नाट्यसंस्थेतर्फे झाले. पुण्यातला प्रयोग मी जेव्हा पाहिला, तेव्हा त्या प्रयोगानंतर वझेसरांचे व 'जागर' मंडळाचे अभिनंदन करणाऱ्यांच्या रांगेत मी होतो. तेव्हा वझेसर म्हणाले, ''तुम्ही कसे काय इथे आलात? प्रायोगिक रंगभूमीकडे तर तुम्ही सहसा फिरकताना दिसत नाहीत.'' मी त्यांना एवढेच म्हणालो, ''नाटिका शिरवाडकरांच्या कथेवरची आहे ना! अन् मी तर कुसुमाग्रज-शिरवाडकरांचा अभ्यासक!''

पुढे वझेसरांनी आपल्या सर्व चमूसह प्रत्यक्ष नाशिक शहरी आपल्या नाटिकेचा प्रयोग शिरवाडकरांसमोर सादर केला. छोट्या चमूंचा देखणा प्रयोग पाहून शिरवाडकरांचे मन बहरून आले होते. त्यांनी वझेसरांकडे या प्रयोगासंबंधीचे पसंतीचे उद्‌गार तर काढलेच; शिवाय बालनाट्यात भूमिका केलेल्या मुलामुलींशी आपुलकीचा संवाद केला.

आपण तयार केलेल्या नाट्यसंहितेमध्ये कुसुमाग्रजांनी गीते लिहावीत असे वझेसरांच्या मनात आले होते. पण ते लिहितील की नाही याबाबत ते शंकित होते. म्हणून त्यांनी एक युक्ती केली. त्यांनी स्वत:च चार गीते लिहिली आणि ती कुसुमाग्रजांकडे पाठविली. यामागे सरांचा हेतू असा होता की, कुसुमाग्रज काही ही गीते 'पास' करणार नाहीत. मग आपणच त्यांना गीते लिहून देण्याची आग्रहाची विनंती करू. पण वझेसरांची ही युक्ती यशस्वी झाली नाही. कारण स्वत: कुसुमाग्रजांनाच ती गीते आवडल्याचे त्यांनी वझेसरांना कळविले होते. इतकेच नव्हे तर ' 'नंदनवन'वर आपले कोठेही नाव नसावे; कारण ही कलाकृती सर्वस्वी तुमची स्वत:ची निर्मिती आहे.' अशा स्वरूपाचे प्रत्युत्तरही त्यांनी वझेसरांना पाठवले होते. थोरांचे थोरपण सामावलेले असते ते त्यांच्या अशा वेगळ्या कृतींत.

माझ्या कुसुमाग्रज यांच्या संदर्भातील संशोधकीय वाटचालीत सन २०२०नंतर मी ‘वि. वा. शिरवाडकर यांच्या नाट्यलेखनाचा शोध - अभ्यास’ ही संहिता लिहिली. वयाची ८० वर्षे ओलांडून गेलेल्या उतारवयात ही संहिता सिद्ध करण्याच्या कामात मला सन्मित्र डॉ. विनायक गंधे यांची खूपच मदत झाली. या ग्रंथसंहितेत प्रा. माधव वझेकृत ‘नंदनवन’ हा टिपणलेख मी समाविष्ट केला. तो एकदा वझेसरांच्या नजरेखालून घालावा असे मला फार वाटत होते. माझी विनंती त्यांनी मान्य केली. एक-दोन तांत्रिक दुरुस्त्या करून ग्रंथात लेख समाविष्ट करण्यास अनुमतीही दिली. या कामासंबंधी जेव्हा आमची भेट झाली, तेव्हा वझेसर खूप खुशीत होते. त्यांनी आमच्याशी छान गप्पागोष्टी केल्या. त्यांनी सांगितलेली त्यांच्या ‘जागर’ संस्थेसंदर्भातील एक गंमतगोष्ट सांगण्यासारखी आहे. ती अशी -

वझेसर म्हणाले, ‘‘कुठलीही संस्था काढायची म्हणजे नुसते विचार व कार्य यांच्यावर भागत नसते. मुख्य मुद्दा असतो तो म्हणजे पैशांचा, भागभांडवलाचा! आम्ही आठेक मित्र आहोत. मी त्यांना म्हणालो, ‘आपण प्रत्येकाने एकेक हजार रुपये द्यायचे अशी माझी सूचना आहे.’ (त्या ४०-५० वर्षांपूर्वीच्या काळात ही फार मोठी रक्कम होती.) मग मी थोडं थांबून म्हणालो, ‘माझी उपसूचना अशी आहे की, पैसे दिल्याची ही गोष्ट बायकोला मुळीच कळू द्यायची नाही!...’ ’’ ही गंमत सांगताना वझेसरही आमच्याबरोबर खूप हसत होते.

त्या सुरुवातीच्या काळात पैसे कसे वाया जात होते, हेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘एकदा रंगीत तालमीसाठी ‘मराठा चेंबर ऑफ कॉमर्स’चा हॉल भाड्याने घेतला. स्टेज, पॉपर्टी कुठे व कशी मांडायची आणि पात्रांना कुठे - कुठे उभे करायचे याचीच चर्चा करण्यात सगळा वेळ गेला आणि प्रत्यक्ष तालमीसाठी तो महागडा




पॉप, रॉक, जॅझ, कंट्री, डिस्को...
हे संगीतप्रकार म्हणजे पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रवासातील
वेगवेगळ्या पाऊलखुणा. या प्रकारांचा अनुभव देणारं,
पाश्चात्त्य जीवनशैली आणि संगीताचा अनुबंध
उलगडणारं, मायकेल जॅक्सनपासून शकिरापर्यंतच्या
कलाकारांच्या रंगीबेरंगी स्वरचित्रांना
शब्दांतून रेखाटणारं लयपश्चिमा संग्रही हवंच...

**लयपश्चिमा**

डॉ. आशुतोष जावडेकर

किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

हॉल पुन्हा भाड्याने घ्यावा लागला. वझेसरांचे कलाजीवनातील किस्से ऐकताना मला व गंधेसरांना वाटले की, अशा भेटी वारंवार व्हायला हव्यात. पुढे शिरवाडकरांच्या नाटकांवरील आपले प्रकाशित पुस्तक वझेसरांना समक्षच द्यायचे आणि पुन्हा त्यांच्याकडून अशा गंमतगोष्टी ऐकायच्या असे मी व गंधेसरांनी ठरवले.

पुस्तक तयार होताच मी वझेसरांना तसा फोनही केला. पण त्यांना सवड कशी ती मिळतच नव्हती. अखेर मार्चच्या आरंभीचा सोमवार ठरला; पण नियती आड आली नि आमची लांबत गेलेली भेट झालीच नाही. खरंतर ती भेट माझ्यासाठी आणि गंधे सरांसाठीही एक 'नंदनवन'च असणार होती; मात्र वझेसरांच्या चिरकालाच्या विरहाने आम्हां दोघांच्या मनातले ते 'नंदनवन' कोमेजून गेले.

आता वझेसरांची आठवण झाली आणि त्यांचे एखादे पुस्तक समोर आले की आमची 'राहून गेलेली भेट' मनात रेंगाळत राहते, रेंगाळतच राहते!

***डॉ. द. दि. पुंडे***
९८३४६७३४६५




अल्पायुषी ठरूनही रसिकांच्या मनावर आजही गारूड करणाऱ्या गुरुदत्तवरील 'चरित्र-कादंबरी-जीवनप्रवास' अशा संमिश्र घाटाचा, त्याच्या चरित्रातील नव्या पैलूंवर प्रकाश टाकणारा हा ऐवज.

**प्यासा**

सुधीर नांदगावकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय या अंगांनी विचार केला आहे.

**गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका**

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)



**विज्ञानाबद्दल कुतूहल असणाऱ्या, तसेच रहस्य आणि गूढतेविषयी आकर्षण असणाऱ्या रसिक वाचकांसाठी तीन नव्या कादंबऱ्या...**



नव्याने रुजू झालेला तरुण, तडफदार इन्स्पेक्टर धनेश...
गावातील प्राचीन शिवमंदिर नि त्याविषयीच्या आख्यायिका...
एकामागोमाग एक घडणाऱ्या रहस्यमय घटना...
धनेश त्याच्या गुप्त 'मिशन'मध्ये यशस्वी होणार का?

## द सीक्रेट मिशन

राधिका कुलकर्णी

किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. ₹ ५०)

१६९५मध्ये औरंगजेबाच्या एका जहाजावर पडलेल्या दरोड्याचा शोध घेण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग केला जातो. ही सांगड घालताना निर्माण होणारे प्रश्न आणि निघणारे निष्कर्ष खरे असतील का? किंवा खरेच निघाले तर...?



## १६९५ : स्मार्ट रोबो, एआय आणि औरंगजेब...!

सुरेश वांदिले

किंमत : ₹ २४०/- । (ट.ख. ₹ ५०)



पंचक्रोशीतला वतनदारांचा वाडा. वैभवशाली, सालंकृत लक्ष्मीसारखा देखणा... वाड्यात अधूनमधून दिसणारा मूळपुरुष नाग... आणि घरातल्या कर्त्या, सवाष्ण स्त्रियांना अल्पायुष्याचा शाप... काळाच्या कुपीत दडलेली रहस्यं उलगडत जाणारी कादंबरी.

## सवाष्ण

डॉ. क्षमा गोवर्धने शेलार

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)

# क... कवितेचा

## मराठी मनाच्या सर्जनशीलतेला पाऊलवाट देणारे सदर

### तो... एक इतिहास पुरुष... अवतार पुरुष...

पृथ्वीराज चौहान अरे
राजा पृथ्वीराज चौहान
मी तसा लहान
पण माहीत आहे मला
की तू आहेस खूप महान

काही लोकांचे बोल
पडत असत कानी
म्हणे श्रीकृष्णाचा अवतार होतास तू
परंतु हे मात्र कधीच कोणी
करीत नव्हते नमूद
      की...
श्रीकृष्णाचा अवतार असणं
म्हणजे नक्की कोण
आणि काय होतास तू?

मग काय रे सम्राट
ज्याप्रमाणे तुझ्या नावातच दडलेली
पृथ्वी स्वत:भोवती अन् सूर्याभोवती
आलीय शतकानुशतके फिरत

तसंच माझ्या डोक्यात
      अन् मेंदूत...
विचाराचेच एक सुदर्शनचक्र
धावू लागले गरगरत

ज्याप्रमाणे श्रीकृष्ण एक
क्षत्रिय अन् न्यायप्रिय राजा होता
त्याप्रमाणे हे पृथ्वीराज
तुझाही पिंड
काही वेगळा नव्हता

ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने
आपली प्रेयसी रुक्मिणी
हिच्याशी पळून जाऊन
विवाह केला होता
तू पण हे सम्राट
तुझ्या संयोगिताला असाच
घेऊन आला होता

तसेच मुरलीधराचे काव्य अन्...
संगीतप्रेम तर आहे सर्वश्रुत
तेव्हा कृष्णाच्या गवळणी
अन् त्याची मधुर बासरी ऐकताना

मला आठवतात ते
चाँद बरदाई आणि तूच

परंतु हे रे काय
पृथ्वीराज
श्रीकृष्ण आणि तू
जेव्हा तुम्ही दोघं
होतात बेसावध अन् पाठमोरे
तेव्हाच तुम्हा दोघांना ही
तीक्ष्ण बाणांनी टिपले रे

जसा युगंधराला मारणारा होता पारधी
तसा तुला बाण लागला
त्याला कारण ठरला
महंमद घोरी

तसं पाहता
श्रीकृष्ण वेगळा होता
आणि वेगळा होता तू
परंतु जीवनाच्या इतक्या
साधर्म्यामुळेच
लोकांसाठी अवतार पुरुष
बनून गेला असावास तू

***चैतन्य सदाशिव डुम्बरे***
९९२३९८८३१०


समग्र समाजमन आणि कालखंड
यांच्या सोबतीनं केलेला हा काव्यप्रवास
वाचकांनाही समृद्ध अनुभव देईल असा...

## त्यानंतर...

श्रीपाद भालचंद्र जोशी

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)




कवितेवर प्रेम करणाऱ्या एका कविमनाचा कवितेसोबतचाच
हा भावविभोर करणारा, तर कधी अंतर्मुख करणारा प्रवास.
'माझी कविता माझ्यासाठी' असं म्हणणाऱ्या
या मनस्वी कवीची कविता वाचता-वाचता कधी
आपली होऊन जाते हा अनुभव घ्यायलाच हवा!



## दत्तप्रसाद दाभोळकरांच्या कविता

दत्तप्रसाद दाभोळकर

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# उद्गार

नियतकालिकांचे / समाजमाध्यमांचे अभिप्राय

## एव्हरेस्टच्या छायेतील हृदयस्पर्शी कुटुंबकथा

*मराठी साहित्यात वेगवेगळे वातावरण अर्थातच व्यवसाय किंवा नोकरीमुळे निर्माण झालेले जग, तसेच विविध विषय वेगवेगळ्या फॉर्ममध्ये येत असतात. सिद्धहस्त लेखिका मृणालिनी चितळे यांनी लिहिलेली ही कादंबरी आपल्याला गिर्यारोहकांच्या आणि हिमालयाच्या विश्वात घेऊन जाते.*

एव्हरेस्ट शिखर सर करणे ही गिर्यारोहकांची तीव्र इच्छा - वेगळ्या अर्थाने ती महत्त्वाकांक्षा असते. हिमालयीन पर्वतरांगा आपल्याला लेखातून कळत असतात, पण एखाद्या कादंबरीमध्ये एक पात्र म्हणून त्या येताना प्रथमच दिसतात. चितळे यांनी स्वत: गिर्यारोहणाचा अनुभव घेतलाय, त्याचबरोबर गिर्यारोहण मोहिमांसंबंधींची विविध पुस्तके आणि अन्य बाबींचा तपशीलवार अभ्यास करून या कादंबरीचा सगळा डोलारा उभा केला आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे गिर्यारोहक जॉर्ज मॅलरी यांनी एव्हरेस्ट शिखर सर करण्याचा प्रयत्न केला, मात्र १९२४मध्ये त्यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यानंतर १९९५मध्ये त्यांच्या नातवाने एव्हरेस्ट शिखर सर करून आपल्या आजोबांना एक प्रकारे आदरांजली वाहिली. त्यानंतर १९९९मध्ये मॅलरी यांच्या ७५व्या स्मृतिवर्षात एक शोधमोहीम हाती घेण्यात आली. त्यामध्ये त्यांचा मृतदेह सापडला. काही वस्तू सापडल्या. या तीन घटना सत्य आहेत. या सत्य घटनांचा आधार घेऊन चितळे यांनी गिर्यारोहण करणाऱ्या एका कुटुंबाची रचना केली. त्याला अन्य गिर्यारोहकाची व त्यातल्या संस्थांची जोड दिली. या गिर्यारोहकांमध्ये घडणाऱ्या गोष्टी आणि परस्परांमधील संबंध यातून ही कादंबरी उलगडत जाते.

ही कादंबरी म्हणजे केवळ एखाद्या हिमालयीन ट्रेकचा वृत्तान्त आहे असे नाही तर ट्रेकच्या निमित्ताने एका कुटुंबाच्या तीन पिढ्यांमध्ये काय-काय घडतं, ते कळतं; हे रंगवणं वेगळंच आहे. मुळात हे पुस्तक मॅलरी यांचे चरित्र नाही किंवा एका जागतिक घटनेच्या कथानकासाठी केवळ तयार घटनेचा वापर करायचा असा प्रकार नाही. मॅलरी यांच्या आयुष्यातल्या घटनांचा एखाद्या पार्श्वभूमीसारखा वापर करून संपूर्ण

नव्या कथानकात लेखिका आपल्यासमोर येते. ही कथा उलगडत जाते वेगवेगळ्या देशांत, यातली पात्रे आहेत तीन पिढ्यांमधली. पण माणूस कुठेही असला, तरी माणुसकी, भावभावना आणि त्या त्या देशातले प्रश्न हे कितीही वेगळे असले तरी मानवी जीवनावर त्याचा परिणाम होत असतो, तो नेमक्या शब्दांत टिपून चितळे तो परिणाम इथे उत्कटपणे मांडतात. कुठेही एखादा वृत्तपट किंवा प्रवासवर्णन अथवा एखाद्या मोहिमेचे वर्णन असा प्रकार इथे नाही. पण हिमालय केवळ तोंडी लावायला घेतलाय असेही नाही. माणसांच्या भावभावनांचे जेवढे डोंगर उंच असतात, तेवढेच हिमालयीन पर्वतरांगांचे उंच वातावरण इथे कथेत चपखलपणे येते.

कुठली शोधकथा किंवा रहस्यकथा न वाटता माणसांचा पीळ व त्यातून नातेसंबंधांची घट्ट वीण गुंफत ही कादंबरी उलगडत जाते. चितळे यांनी २४ प्रकरणांमध्ये हा सारा कालपट उलगडला आहे. एकाच वेळेला आजोबा नातू, वडील-मुलगा, दोन तरुणांच्या आयुष्यातील प्रसंग, पतिपत्नीमधील प्रेम, संसारविषयक जबाबदाऱ्या, एखाद्या गोष्टीने माणसे अस्वस्थ का होतात? आपल्या ध्येयाचा पाठलाग करताना काय-काय अडचणी येतात, त्यावर मात कशी करायची, हे सारे अत्यंत विलक्षण पद्धतीने लेखिकेने आपल्यासमोर उलगडले आहे. शेर्पा तेनसिंग आणि एडमंड हिलरी यांनी एव्हरेस्ट शिखर सर केल्यावर त्याच्या बातम्या येणे किंवा त्यांच्या विक्रमाची सतत नोंद होणे हे नवीन नाही, पण या घटनेचा एखाद्या पात्रावर किती परिणाम होतो, हे क्लेअर नावाच्या महिलेच्या माध्यमातून लेखिकेने दाखवून दिले आहे. क्लेअर ही विल्यम रॉबर्टसन यांची कन्या. हेच पात्र जॉर्ज मिलरी यांच्यावरून घेतले आहे.

या पुस्तकातील प्रकरण २ व ३ हे आवर्जून वाचावे असे आहे. एका अर्थाने या पुस्तकाचा आत्मा या प्रकरणातून लक्षात येतो. त्याचबरोबर गिर्यारोहकांचे जीवन आणि हिमालयाचे आकर्षण कसे असते हे स्पष्ट करणारे आहे. विल्यम रॉबर्टसन यांचे सहकारी डॉ. रोलिंग आणि प्रो. ब्रुक हे दोघेही जण रॉबर्टसन यांची मुले डेनिस आणि मुलगी क्लेअर यांना भेटतात. या भेटीत ते रॉबर्टसन यांच्याबरोबरच्या एव्हरेस्टच्या मोहिमेची माहिती सांगतात. ती मोहीम कशी चित्तथरारक होती, या मोहिमेत विल्यम यांनी मित्रासाठी एव्हरेस्ट सर करायची संधी कशी सोडली तो सारा तपशील कळतो. अर्थात या दोघांनी सांगितलेला तपशील ऐकून डेनिस आणि क्लेअर यांच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या असतात. क्लेअरला तिच्या वडिलांबद्दल प्रचंड प्रेम असते. त्या प्रेमात उलट भरच पडते. डेनिसला मात्र वडिलांच्या हिमालयीन मोहिमेविषयी थोडीफार नाराजी असते. ती नाराजी कमी होण्याऐवजी वाढतेच. लंडनमधील घर विकण्याच्या निमित्ताने एकत्र आलेले डेनिस आणि क्लेअर यांच्यातील नात्यांचा गुंता कळतोच कळतो; पण कथानायक विलीच्या मनात आजोबांविषयी जे कुतूहल जागृत होते आणि एव्हरेस्ट मोहिमेचे बीजारोपण कसे होते तेही कळते.

या कादंबरीत हिमालयीन जग आणि गिर्यारोहकांचे विश्‍व उलगडले गेले आहे. आतापर्यंत पोस्ट खाते, जहाजावरचे जग तसेच सैन्यदलातले आयुष्य त्याचबरोबर उपेक्षितांच्या आयुष्यातले अडचणींचे प्रसंग आणि त्यांचे जग साहित्यातून पुढे आले आहे. पण गिर्यारोहक आणि हिमालयीन ट्रेक इतक्या मोठ्या प्रमाणात म्हणजे सारे कथानकच त्याभोवती गुंफलेले असे झालेले नाही. ग्रेसी, तिचे पती विल्यम रॉबर्टसन, त्यांची मुले टेनिस आणि क्लेअर, डेनिसचा मुलगा विली आणि त्याची बायको केझिया, विलीचे जवळचे सहकारी यांच्या दिनक्रमातून हिमालयीन जग उलगडत जाते. बर्फाळ जगातल्या मानसिक आंदोलनाची ही कथा मात्र सळसळती आणि मनावरचा तोच तोचपणाचा बर्फ विरघळवून टाकते.

कादंबरीत जशी आजोबांच्या कर्तृत्वाची गाथा आहे तसेच त्यांचे एव्हरेस्टचे स्वप्न पूर्ण करणारा नातूदेखील आहे. त्याला एव्हरेस्ट मोहिमेचा लागलेला ध्यास त्याच वेळी त्याची पत्नी केझिया हिच्याबरोबरचे त्याचे प्रेम या दोघांमधील प्रेमाचा प्रवास आपल्यासमोर येतो. एका पत्रातून कथानायक विलीला साथ देणारा अशोक याचे जीवन उलगडते. बापलेकाचे संबंध किती गुंतागुंतीचे असू शकतात याचा प्रत्यय देणारे प्रसंग यात आहेत. अशोकचे पत्र याबाबतीत पुरेसे बोलके आहे. कथानायक विली याची आत्या क्लेअर ही या कादंबरीत महत्त्वाची भूमिका बजावते. हिमालयातल्या गिर्यारोहणामधल्या विक्रमवीराच्या घरातील ही कन्या जगातील किती गोष्टींशी संबंधित आहे आणि नकळतपणे तिच्यावर किती गोष्टींचा ताण आहे हे तिच्या व्यक्तिरेखेतून कळते.

मराठी साहित्यात आतापर्यंत काही नामवंतांनी वेगळ्या जगाचा वेध घेतला; पण गिर्यारोहण हा विषय ज्या पद्धतीने या कादंबरीत समोर येतो, त्यात वाचक हरवून जातोच. गिर्यारोहणातील क्लिष्टता किंवा त्यातील तांत्रिक बाबींचा भडिमार येथे

एव्हरेस्ट शिखर सर करण्याच्या अनावर ओढीपायी
तीन पिढ्यांमध्ये निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष
आणि परस्परांना समजून घेण्याचे प्रयास
चित्रित करणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी!



**ज्याचं त्याचं एव्हरेस्ट**

मृणालिनी चितळे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. ₹ ५०)

नसल्याने कथानायक विली आणि त्याच्या सभोवतालची पात्रे यामध्ये वाचकांचे मन गुंतते आणि दोघांचे भावविश्व एक होते, हेच लेखिकेचे यश आहे. गिर्यारोहक सातत्याने हिमालयात कसे जातात, त्यांना हिमालय कसा खुणावत असतो, त्याचाही शोध यातल्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून लेखिकेने घेतलाय.

**अश्विनी देव**

(*सकाळ*, सप्तरंग, रविवार ४ मे २०२५मधून साभार)

---

## सो कुल.. टेक २

मराठी नाटक, सिनेमा करत हिंदीसह गुजराती, तमिळ, कन्नड अशा इतर भारतीय भाषांतील चित्रपटांत तितक्याच समर्थपणे अभिनय करून अभिनयक्षेत्रात उच्चस्थान प्रस्थापित करणारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या 'सो कुल.. टेक २' पुस्तकाची बातमी वाचल्याबरोबर हे पुस्तक वाचण्याची माझी उत्सुकता वाढली. हे पुस्तक पुण्याच्या 'राजहंस प्रकाशन'ने प्रकाशित केले आहे.

राजहंसशी संलग्न असलेल्या सचिन मणेरीकरांशी मी संपर्क केला, तर त्यांनी पुस्तक घरपोच आणून दिले. सोनाली कुलकर्णी 'विन्सन वर्ल्ड' आयोजित गोता चित्रपट महोत्सवात बऱ्याचदा सहभागी झाल्या आहेत. मी चित्रपट महोत्सवाच्या आयोजनात सक्रिय असल्यामुळे उदयोन्मुख कलाकारांबरोबरच प्रथितयश कलाकार, दिग्दर्शक तसेच निर्मात्यांना जवळून भेटण्याची संधी मिळते. त्यामुळे सोनालीला जवळून भेटण्याचा तसेच तिची मुलाखत घेण्याचाही योग आला. काही वेळा आम्ही यशस्वी कलाकारांबद्दल उगाच गैरसमज बाळगतो. व. पु. काळे यांची 'मीच तुझी वहिदा' नावाची एक कथा आहे. त्या कथेत कथेचा नायक लघाटे म्हणतो, 'मला वाटलं होतं की मोठ्या माणसाचं सगळंच मोठं असेल. म्हणजे अगदी वहिदा रहमानचा हातरुमालसुद्धा बारा बाय बारा फुटांचा असेल.' सोनालीला भेटण्याआधी माझीही अगदी सेम स्थिती झालेली. परंतु पहिल्याच भेटीत सोनालीच्या मनमोकळ्या बोलण्याने माझ्या मनावरील सर्व दडपण दूर झाले. या मुलाखतीदरम्यान सोनाली कुलकर्णीच्या स्वभावातील साधेपणा, तसेच तिच्या संवेदनशील मनाचा प्रत्यय आला. पुस्तकातील लेख वाचल्यानंतर आपणासही तिचा जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन भावल्याशिवाय राहणार नाही.

'सो कुल'मधील लेख खरे तर 'लोकसत्ता' वर्तमानपत्रात लिहिलेले स्तंभलेख आहेत. सोनालीच्या स्तंभलेखनात केवळ समाजप्रबोधनाचेच विषय नसून तिच्या

बालपणापासून, आई, बाबा, आपला गाव, गावातील नदी, नाले, त्यात पोहणे, असे चौफेर विषय येतात. मला तर हे पुस्तक वाचताना मी लिहिलेल्या 'काळीज उसवलं' पुस्तकाशी नाते सांगणारे अनेक लेख मिळाले. होम स्वीट होम, सायकल, ओढ, एक टाका सुखाचा, आली माझ्या घरी यांसारखे कितीतरी लेख वाचल्यानंतर आपले बालपण, आपले जवळचे नातेसंबंध शोधत वाचकाला गतकाळात घेऊन जातात. सोनालीचे हे लेख वाचता वाचता आपण भारतातल्या एका नामवंत अभिनेत्रीने हे पुस्तक लिहिले आहे हे क्षणभर विसरूनच जातो. ही कोणीतरी आपल्यातलीच, मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी आहे, आपल्याच मनातील, आपल्याच रोजच्या जीवनाशी संबंधित लिहिणारी, आपल्याच गावची आपली संवेदनशील बहीण आहे, असे वाटल्यावाचून राहत नाही आणि हीच तिच्या लेखनाची खासियत आहे. तिच्या लेखनाला विषयांची उणीव नाही. रस्ते, फुटपाथ, लग्नसमारंभात होणाऱ्या अन्नाच्या नासाडीवरही लेख आहेत. एकंदरीत सर्वसामान्य माणसाशी निगडित विषय आहेत.

सोनालीच्या लेखनाचे विषय तर रोजचेच आहेत, किंबहुना आपल्या घरातलेच, आजूबाजूच्या परिसरातलेच आहेत. आपल्या घरातील फ्रिज हा लेखाचा विषय होऊ शकतो का? पुस्तकात 'फ्री!(ज)' आणि 'फ्रोझन फोटो!' हे दोन्ही लेख फ्रिजवर लिहिले आहेत. अगदी हलक्याफुलक्या भाषेत घराघरातील फ्रिजमधील लक्तरे उघड्यावर पाडली आहेत. उदाहरणार्थ 'जरा वरमूनच फ्रिजच्या अंतरंगात नजर टाकली. ठासून भाज्या भरल्या होत्या. कोबीच्या मागे एक जंबो कलिंगड होतं. भाज्या इतस्तत: पडल्या होत्या. निम्म्या भाज्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्येच होत्या. काही पिशव्यांच्या गाठी न सोडता त्यातूनच कोथिंबीर वगैरे उपसली होती.' या


अरब जग म्हणजे अमाप श्रीमंती अन् उन्मादी दहशतवाद.
समज अन् गैरसमजांच्या बुरख्यात दडलेलं
हे जग आहे तरी कसं? इतिहास, राजकारण,
समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, लोकजीवन
अशा धाग्यांचा धांडोळा घेत वाळवंटातल्या
वेगवेगळ्या पाऊलखुणांचा हा अनोखा शोध...

**धागे अरब जगाचे**

विशाखा पाटील

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)



लेखातील हा छोटासा उतारा वाचल्यानंतर आपल्या डोळ्यांसमोर आपल्या घरातील फ्रिजचं ओंगळवाणे दृश्य सरकून गेल्याशिवाय राहणार नाही.

देवावरील श्रद्धा अतूट ठेवूनही अंधश्रद्धेवर कशी मार्मिक टिप्पणी करता येते, याचे बोधप्रद उदाहरण म्हणजे या पुस्तकातील 'शिर्डी' हा लेख. देवाची भक्ती जरुर करावी. परंतु देवाच्या दरबारी गर्दी, चेंगराचेंगरी करून आपण काय साध्य करू पाहतो?

रोजच्या जीवनातील समस्या आणि विषयांना धीरगंभीर पद्धतीने न मांडता सहजपणे संवाद साधत मांडले आहेत. पुस्तकातील लेख वाचकाच्या काळजाला स्पर्श करतात. बाळाची आई जशी बाळाच्या नकळत गोड मिठाईमध्ये औषध मिसळून बाळाला भरवते, काही प्रमाणात लेखिका समाजाला अगदी नकळत वैचारिक डोस देऊन जाते. असे असले तरीही सोनालीच्या लेखनात समाज सुधारण्याचा आविर्भाव नाही आणि कुणाला फुकटचा सल्लाही नाही.

आपल्या सभोवताली जे जे घडते त्याचा आपणही एक भाग आहोत, याची प्रामाणिक जाणीव ठेवून लेखन केल्यामुळे विषय आणि लेख वाचकाच्या काळजाला भिडतात. वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडतात. हे केवळ एका नामवंत अभिनेत्रीने लिहिलेले पुस्तक नसून एका सर्जनशील लेखिकेचा हा आतला आवाज आहे. एका संवेदनशील मनाचा हुंकार आहे. पुस्तक वाचनीय तर आहेच, किंबहुना विचारप्रवर्तक आहे.

**उदय म्हांबरे**

(*लोकमत*, गोवा आवृत्ती, शनिवार १२ मे २०२५मधून साभार)




तुम्हाला जीवन अधिक सुंदर बनवायचंय...!
मग हे पुस्तक संग्रही असायलाच हवं.
या पुस्तकातील सुंदर कल्पना, नीतिमूल्ये
आपल्याला समृद्ध जगण्याचं
भान देतात. तेव्हा जरूर वाचा...

जीवनात आनंद फुलवा!

एस. एच. नायक । अनु. माधुरी शानभाग

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. ₹ ५०)

# राजहंसी पार

काय घडलं 'राजहंसी' नगरीत?

## 'कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या!'
## अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान मंत्री मा. आशिष शेलार, सुहास बहुळकर, विनायक पणशीकर आणि चित्रकार विद्या वैद्य

सुहास बहुळकर लिखित 'कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या!' या मौलिक ग्रंथाचे अनौपचारिक प्रकाशन नुकतेच मुंबई येथे महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान मंत्री मा. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी 'राजहंस'च्या मुंबई शाखेचे प्रतिनिधी विनायक पणशीकर, चित्रकार विद्या वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते. शिवचरित्रावरील या मौलिक ग्रंथनिर्मितीबद्दल मंत्रिमहोदयांनी सुहास बहुळकर यांचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.



मा. उद्धव ठाकरे यांना पुस्तकाची माहिती देताना लेखक सुहास बहुळकर

---

## 'इन्शाअल्लाह' कादंबरी अभिवाचन




डावीकडून अभिनेत्री स्वाती चिटणीस, सचिन सुरेश, सलीम मुल्ला
आणि लेखक अभिराम भडकमकर

मुस्लिम समाजाच्या वास्तवाचे जिवंत चित्रण करणाऱ्या 'इन्शाअल्लाह' या बहुचर्चित कादंबरीच्या अभिवाचनाचा कार्यक्रम प्रिसिजन वाचन अभियानांतर्गत सोलापूर येथे डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात नुकताच संपन्न झाला. लेखक आणि दिग्दर्शक अभिराम भडकमकर लिखित 'इन्शाअल्लाह' या कादंबरीचे अभिवाचन अभिनेते सलीम मुल्ला, सचिन सुरेश तसेच ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती

चिटणीस यांच्यासह स्वत: अभिराम यांनी केले. त्यांच्या सशक्त आणि भावस्पर्शी वाचनातून कादंबरीतील कथानक जिवंत झाले. प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित प्रेक्षकांशी कलाकारांनी या कादंबरीबद्दल प्रश्नोत्तरात्मक चर्चा केली.

---

## 'गोष्ट रिझर्व्ह बँकेची' अनौपचारिक प्रकाशन



डावीकडून मुकुंद संगोराम, डॉ. सदानंद बोरसे, दिलीप माजगावकर,
विद्याधर अनास्कर आणि सौ. अनास्कर

❖

भारतीय शेतकऱ्यांमध्ये जागृतीचा मंत्रजागर करणारे, बुद्धिवादी, संवेदनशील, किचकट अर्थशास्त्राच्या मुळाशी भिडणारे, आत्मशोधाचे प्रवासी आणि शेतकऱ्यांचा देव झालेले हे अफाट व्यक्तित्व जाणून घेण्यासाठी वाचायला हवे...

शरद जोशी
शोध अस्वस्थ कल्लोळाचा!

वसुंधरा काशीकर - भागवत

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा



हे चरित्र आहे... जगावेगळं तेजोवलय लाभलेल्या उर्दू शायर फैज अहमद फैज यांचं! फाळणीनंतर पाकिस्तानात गेलेल्या फैज यांच्या गजला, पत्रकारिता, तुरुंगवारी, प्रेमप्रकरणं, आयुष्यातील चढउतार आणि त्यांची अर्धीमुर्धी स्वप्नं हे सारं यात सामावलंय. तेव्हा जरूर वाचा...

### फैज अहमद फैज : एक प्यासा शायर

प्रतिभा रानडे

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. ₹ ५०)

जी.ए. - केवळ कथांमधून जीवनाचा भला मोठा पैस कवेत घेणारे कथाकार! जीएंचा अंत:प्रवाह, कथासृष्टीतील पात्रे, परिसर, कथानक यांचा त्यांच्या अर्पणपत्रिकांतून घेतलेला हा शोध नक्कीच वाचा...

### अर्पणपत्रिकांतून जी.ए. दर्शन

वि. गो. वडेर

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)





डॉ. नारळीकरांचे एक रूप आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या खगोलशास्त्रज्ञाचे, तर दुसरे रूप किशोरवयीन मुलामुलींना विज्ञानातील संकल्पना हसतखेळत शिकवणाऱ्या आणि विविध कथांमधून त्यांना रमवत, रिझवत अनोख्या जगाची सफर घडवणाऱ्या विज्ञानलेखकाचे. त्यांच्या प्रतिभाविलासातून उमललेल्या सात बहुरंगी कथांचे इंद्रजाल.

### मायाजाल

डॉ. जयंत नारळीकर

किंमत : ₹ ११०/- । (ट.ख. ₹ ५०)

## वाचकांच्या मनातलं

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

### विवाह नाकारताना

'विवाह नाकारताना' वाचले व ते आपणास कळवावे असे फारच वाटल्यामुळे हा प्रपंच.

मुखपृष्ठ बहुळकरांचे आहे म्हटल्यावर त्या अँगलने पहिले डायरीची पाने दाखवली आहेत. ती आत्मकथनासाठी सबळ पुष्टी देणारे असे सूचित करते. याशिवाय अधिक माहिती वाचण्याची सोय आहेच. आपले भाषेवर प्रभुत्व आहे. नेमकेपणाने लेखन केले आहे. वाचायला आवडत जाते. कंटाळा जाणवत नाही. भाषा ओघवती आहे.

या विषयावर प्रथमच वाचायला मिळाले. विवाहासंदर्भात स्त्रीच्या भावना, इच्छा, आकांक्षा काय असतात, काय असू शकतात हे समजण्यासाठी मदत होते. आपण जे अनुभव लिहिलेत असा विचार स्त्रियांच्या बाबतीत पुरुष वर्गाकडून सर्रास होईलच असे नाही. लोक जे अपुऱ्या माहितीवर बोलत असतात त्याची बोचणी स्त्रीला किती होत असते हे आपल्या कथनात वेळोवेळी जाणवते, ती समाजमनाने घेऊन सुधारणा करण्यासारखी आहे. सर्व लेखन प्रांजळ आहे. आपल्या विचारात स्पष्टता आहे. आपला मार्ग व वर्तन सरळ व सभ्य असल्यास परिणामाची तमा बाळगण्याची गरज नसते ही फार मोठी शिकवण हे आत्मकथन देते. प्रकरणानुसार आपण जे लिहले आहे ते अगदी निश्चितपणे तसेच घडलेले आहे, असेच वाटते. सर्व प्रसंग हुबेहूब लेखनातून उभे केले आहेत. दिलेल्या संदर्भानुसार आपल्या विस्तृत स्वरूपाच्या वाचनाची ग्वाही मिळते. आपण हातचे राखून काही लिहिले आहे असे कुठेही वाटत नाही. स्त्री-पुरुष संदर्भात काही स्पष्ट मुद्दे किंवा विचार हे आत्मचरित्र वाचकापुढे ठेवते. आपले आकलन व व त्याचे विश्लेषण मला फार आवडले. स्त्रीमुक्ती संदर्भात हे लेखन काही अंशी एक वेगळाच विचार पुढे आणून

चळवळीला बळ देणारे आहे. नाते संदर्भातील आपले अनुभव फार बोलके आहेत. प्रसंगाचे वर्णन करताना योजलेली अचूक शब्दरचना भाषेवर प्रेम करणाऱ्याला फार भावते. (हबका, सटपटले, गचडीची, सरबरीत, खताडखाना, पकपक, बलाबला, धबकला, सणसण इ.)

महिमकर हे व्यक्तिमत्त्व फार आवडले. 'स्त्रीउवाच' व 'वळून पाहते तेव्हा...' ही प्रकरणे फार भावली.

एकंदरीत एक चांगले वैचारिक आत्मचरित्र वाचायला मिळाले. या आत्मकथनाची पुढे इतिहासात नोंद होईल. खूप खूप धन्यवाद!

***डी. एफ. शिकलगार***, कराड

---

## दास्तान-ए-दिलीप कुमार

हे पुस्तक वाचलं व भारल्यागत झालं. आमच्या वैद्यकीय क्षेत्रात सदान्‌कदा ताणतणाव, अनिश्चितता, जीवन-मृत्यूचा संघर्ष असंच असतं. गेल्या काही दिवसांत दोन दोन (अति)कठीण केसेस माझ्याकडे admitted होत्या- दोघेही VIP. त्यात मी स्वत: पाठदुखीनी बेजार. अशा परिस्थितीत हे पुस्तक हाती लागलं. वाचायला लागलो... व अधाश्यासारखं वाचतच गेलो.

पेशावर ते मुंबई हा एक जीवनप्रवास तुम्ही समर्थपणे वाचकाला घडवून दिला आहे. वातावरणनिर्मिती तर इतकी सुरेख की पेशावरच्या सुक्या मेव्याचा स्वाद जिभेवर तरळावा, मशिदीतली अजान ऐकू यावी व आजीच्या मिठीची ऊब





मुलीचं लग्न होतं, तेव्हा तिचं जीवन समूळ बदलतं;
हे सर्वमान्य! पण ती एकटीनं, स्वतंत्र राहण्याचा
निर्णय घेते, तेव्हा? तिचं जीवन कसं बदलतं?
काय होतं? स्वत:च्या निर्णयानं, स्वतंत्रपणे,
एकल राहणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन.

**विवाह नाकारताना**

विनया खडपेकर

किंमत : ₹ ४३०/- । (ट.ख. ₹ ५०)

जाणवावी. अप्रतिम निवेदन, सखोल ज्ञान, रसिकतेची प्रगल्भता व विषयाशी संपूर्ण एकात्मता यांमुळे हा माझ्याकरता एक अप्रतिम वाचकानुभव होता. तुमच्या या यशस्वी प्रकल्पाला एक सहृदयी दाद द्यायची तीव्र इच्छा झाली म्हणून हा पत्रप्रपंच.

खरं म्हणजे १९६३च्या जन्मामुळे युसूफमियांच्या कारकिर्दीशी थोडीशी चुकामूकच झाली. मी स्वत: दिलीपकुमारचे जोगन, मिलन, मेला सोडून उर्वरित सगळे चित्रपट 'पाहिले' आहेत, पण 'भावले' मात्र नाहीत. सगळं जग दिलीप दिलीप करतंय मग आपल्यालाच काही दिसत का नाही? हा प्रश्न नेहमी पडायचा. ती 'missing insight' तुमच्या पुस्तकामुळे नेमकी मिळाली. शिरीष कणेकरांच्या पुस्तकातून त्यांची दिलीपभक्ती जाणवली; पण ना रुचली ना आत्मसात झाली. एक आईविना दुर्लक्षित मुलगा थिएटरच्या काळोखात आपलं दु:ख दिलीपकुमारच्या माध्यमातून विसरायचा केविलवाणा प्रयत्न करत होता, अशीच माझी धारणा झाली होती. त्यात दिलीपकुमारविषयी नकारात्मकच जास्ती वाचलेलं. त्यात एकदा आमच्या दादर हिंदू कॉलनीमध्ये गणेशोत्सवात माझ्या बालपणी 'दिल दिया दर्द लिया' दाखवत होते. पाठीमागून एक जोरदार आरोळी ऐकू आली 'अरे डोळे तरी उघड की'. त्यानंतरच्या हास्याच्या सुनामीत उरलीसुरली दिलीप आवडदेखील विरून गेली. आई, काका, काही दोस्तमंडळी दिलीपकुमारचे चाहते. तुमच्या पुस्तकांनी मात्र ३६० कोन वास्तव दाखवत संपूर्ण 'जागृत' केलं... युसूफ खानचं दिलीपकुमारमध्ये रूपांतर झालं. खास करून तुम्ही काही दृश्यांवर जे खोलवर विवेचन केले आहे, ते तर लाजवाब! शक्तीमधला राखीच्या मृत्यूनंतरचा सीन- अगदी मिनिटे-सेकंदांचा हिशोब देत- त्याचा भावनिक व तांत्रिक ऊहापोह. अंगावर काटा आणलात! तसेच मुघले आझम, गंगा जमुना, देवदासच्या काही अजरामर दृश्यांचं सखोल विवरण करून व त्यातील छुपा गर्भित आशय हळुवारपणे

गेल्या काही दशकांत हिंदी सिनेमात वावरणाऱ्या कलावंतांच्या
अभिनयाला जीवनरस पुरवणारा झरा म्हणजे दिलीपकुमार.
अभिनयाच्या क्षेत्रात 'दिलीपकुमारपूर्वी' आणि
'दिलीपकुमारनंतर' असे कालखंड प्रस्थापित करणाऱ्या
या प्रतिभावान कलावंताची नवरसपूर्ण चरितकहाणी

दास्तान-ए-दिलीपकुमार

रेखा देशपांडे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ४०)



उलगडून माझ्यासारख्या रसिकाला अगदी तृप्त केलंत.

लेखकाला, दिग्दर्शकाला, नटाला नेमक काय सूचित करायचं होतं त्याचं रसिकात्मक विश्लेषण करून तुम्ही हे जादुई क्षण अजरामर करून ठेवले आहेत. आणि त्याचबरोबर hero worshipला बळी न पडता दिलीपच्या दोषांवर/ चुकांवरदेखील बोट ठेवायचं पत्रकारिक भान अबाधित ठेवलंत.

गेल्या काही दिवसांत तरी तुमच्या पुस्तकामुळे माझ्या चेहऱ्यावरच्या (genetic/ आनुवंशिक?) खत्रुड व त्रासिक भावांऐवजी एक सुखद स्मित बघून माझे पेशंट्स सुखावले आहेत. So, In a way, श्रीयुत दिलीपकुमार व रेखा देशपांडे या दोघांमुळे वैद्यकीय वातावरण सुखकारक व सहनकारक झालं आहे.

***संजय खरे***, नवी मुंबई

---

## आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग

'आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग' पुस्तक वाचले. ते मला प्रचंड आवडल्याने हा लेखनप्रपंच.

हे पुस्तक वाचल्याने एका वेगळ्याच जगताची ओळख सविस्तरपणे झाली आणि एक वेगळाच व विलक्षण दृष्टिकोन मिळाला हे मला अगदी मनापासून सांगावेसे वाटले.

आर्थिक घोट्याळ्यांविषयी आम्ही सर्वसामान्य माणसे वृत्तपत्रातून, टीव्हीवरून वाचत-ऐकत असतोच. मात्र त्यामागची पार्श्वभूमी, त्याची कारणे, हे गुन्हे





कसे घडतात आर्थिक घोटाळे? कसे सापडतात त्यांचे सूत्रधार? आर्थिक गुन्ह्यांचं गुंतागुंतीचं विश्व सोप्या भाषेत उलगडून दाखवलंय, शोधक वृत्तीच्या नि भेदक नजरेच्या एका तरुण फोरेन्सिक ऑडिटरनं...

**आर्थिक गुन्हेगारीचे अंतरंग**
हर्षद ते हिंडनबर्ग

अपूर्वा प्रदीप जोशी

किंमत : ₹ ३००/- । (ट. ख. ₹ ५०)

उकलतानाची प्रक्रिया, त्या संदर्भातल्या तुमच्या अडचणी, तुमचा संघर्ष या सगळ्याची माहिती मिळाली.

पुस्तकाची भाषा समजायला अतिशय छान, साधी, सरळ-सोपी आहे. मात्र तरीही घोटाळ्यातील आकडे, ते करण्याचे धाडस आणि प्रक्रिया वाचून सुन्न व्हायला होतं. 'मुळात असं का होतं?' यासारखे खूप प्रश्न पडत होते.

तरीही एक नक्की की आम्ही... किंवा आपण भारतीय भाग्यवान आहोत कारण आपल्या देशात अपूर्वाताईंसारखे निष्णात लोक आहेत, बुद्धिमान लोक आहेत. जे सर्वसामान्यांना जागरूक करत आहेत.

अजून खूप काही लिहावेसे वाटते आहे, पण इथे थांबते.

***पल्लवी अकोलकर***, पुणे

---

## ओंजळीतील चाफा

आपल्या 'ओंजळीतील चाफा'चा सुगंध घेते आहे. खूप सुंदर लेखन आहे. विचारसौंदर्य, भावसौंदर्य आणि शैलीचा संयमित, अकृत्रिम विलास, असा साज लेवून उमललेला हा चाफा खूप आवडला. मन:पूर्वक अभिनंदन!

या लेखनातली संदर्भबहुलता लक्षात घेण्याजोगी आहे. विवेकानंद, लो. टिळक, सुभाषचंद्रांपासून ते केशवसुत, बालकवी, मर्ढेकरांपर्यंत अनेक संदर्भ येतात. माझ्या पिढीपर्यंत हे सगळं साहित्य आम्ही मुळातून वाचत होतो. मराठीत ललित लेखनाची चांगली परंपरा आहे. दुर्गाबाई भागवत, गो. वि. करंदीकर (विन्दा),


हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे,
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या
पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. ₹ ५०)




मधुकर केचे, महेश एलकुंचवार, अरुणा ढेरे अशा लेखकांनी किती सुंदर लेखन केले आहे! त्या परंपरेला साजेसे हे लेखन आहे. हे पुस्तक विद्यापीठात लावले जायला हवे. ‘ओंजळीतील चाफा’ आत्मीय सौंदर्याची अनुभूती देतो.

खूप खूप अभिनंदन आणि शुभेच्छा!

***डॉ. मेधा सिधये***, पुणे

---

## माणिकमोती

मी एक ८७ वर्षांची सामान्य स्त्री आहे. केवळ हौस म्हणून ‘माणिकमोती’ या ग्रंथाचे जे मुखपृष्ठ आहे ते किती योग्य व सार्थकी आहे हे या अभिप्रायातून लिहीत आहे. माझी लाडकी माणिक वर्मा ‘आवडती कलाकार’ म्हणून किती योग्य आहे याची तीव्रतेने जाणीव होते. मुखपृष्ठाच्या चित्रकारास अनेक शुभाशीर्वाद. असेच चित्र काढून जीवन सार्थकी लावावे. पुस्तकातील लेख अत्यंत भावनिक आहेत. या पुस्तकाचे वाचक खूप होतीलच यात नवल नाही. आपले नेहमी वाचन करणारी गृहिणी.

***मंगला वैद्य***, पुणे

---

## गोंदणखुणा

खरंच ‘गोंदणखुणा’ म्हणजे उत्कट अनुभव! खूप दिवसांनी असं एक पुस्तक मिळालं की सहज म्हणून मी ते निवडलं! त्याने अगदी हृदयाचा ठाव घेतला. एका उत्कट अनुभवाचा प्रत्यय आला. गोरेगावच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे शतशः आभार. मी माझ्या नोंदणीचे खूप वर्षांनी पुनरुज्जीवन केले व माझ्या हाती या पुस्तकाच्या रूपाने मराठीचा खजिनाच लागला. पुन:नोंदणीचे सार्थक झाले असंच वाटलं. अर्थात याचे श्रेय नि:संशय तुमच्या लेखणीचे.

मी याची निवड केली कारण छोट्याशा गोष्टी असल्याने लवकर वाचून होईल, दुसरे पुस्तक हातात पडेल व वर्गणीचे पैसे वसूल होतील. पण घडले विपरीतच. वाचनाला सुरुवात केली आणि बालपणीच्या आठवणीत रमून गेलो. रात्री, अपरात्री, पहाटे वाचत गेलो, वाचतच गेलो. आमच्यासारख्या सामान्य मुलांचं

शैशवच तुम्ही डोळ्यांसमोर उभं केलंत. बिनपैशाचं बालपण किती रम्य असतं याचा परत एकदा अनुभव घेतला. मन भूतकाळच्या आठवणींत, सवंगड्यांच्या संगतीत रमून गेलं. चोरून पाडलेल्या चिंचा, बोरं, पेरू यांची चव जिभेवर पुन्हा रेंगाळली. खाल्लेला मार, मोठ्यांचा धाक सारं आठवलं. 'ऋणाईत' वाचताना मनाला हुरहुर लागली. बकुळीच्या फुलांचा सुगंध परत दरवळला. बुचाचं झाड मात्र आढळलं नाही. 'दीपमाळ' वाचताना मन विषण्ण झालं. 'तिची दिवाळी'ने सुखाची बरसात केली. 'सृजना'ने तर गुलबक्षीचे रंग डोळ्यांसमोर उभे केले. 'कडू करंज' वाचताना आंब्याच्या झाडाखाली बघितलेल्या सापामुळे झालेला थरकाप आठवला.

'सौंदर्याच्या नव नव लिला' व 'मानवतेचे महन्मंगल गाणे'पण तितकेच भुरळ पाडणारे आहे. त्याबद्दल पुन्हा पंक्तिप्रपंच. जीवनाचे सार साध्या, सरळ, सोप्या भाषेत तुम्ही कागदावर रेखाटले आहे.

या सहज, साक्षेपी लिखाणावरून तुमच्या पेशाची, स्वभावाची कल्पना येते. तुमचं निर्मळ हास्य तर त्याचा पुरावाच आहे.

या चढाओढीच्या जगण्यात निर्भेळ आनंदाचे असंख्य क्षण पेरल्याबद्दल पुनश्च आभार. वयाच्या ७५व्या वर्षी जगण्याची उमेद वाढविली यासाठी मनापासून धन्यवाद.

***चंद्रशेखर परशुराम भोसले***, मुंबई

**मुखपृष्ठ, मुखपृष्ठाच्या व मलपृष्ठाच्या आतील पानांवरील व मलपृष्ठावरील पुस्तकांविषयी...**

- गोष्ट रिझर्व बँकेची — किंमत : ₹ ५५०/-
  विद्याधर अनास्कर
- सर्वोत्तम व समकालीन फादर दिब्रिटो — किंमत : ₹ ५००/-
  संकलन व संपादन : करुणा गोखले
- उद्योग यशोगाथा — किंमत : ₹ २८०/-
  डॉ. अनंत सरदेशमुख
- महानायक — किंमत : ₹ ६५०/-
  विश्वास पाटील

कधी न गळणारा

## ‘राजहंसी’ मोहोर

राजहंस प्रकाशनचे अव्वल लेखक,
त्यांची गाजणारी पुस्तकं आणि रसिक वाचक यांची थेट गाठ दर बुधवारी घालून देणारा
**श्रवणीय साप्ताहिक उपक्रम (ऑडिओ पॉडकास्ट)**
**१ मे २०२४पासून सुरू...**

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
**‘राजहंस ॲप’**

Download on the App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

GET IT ON Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅबलेटसाठी

तुम्ही ‘राजहंस’ला असेही भेटू शकता
Website : www.rajhansprakashan.com

## राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashan1@gmail.com I Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अमृप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

औद्योगिक क्षेत्रातील व्यापक अनुभव व प्रदीर्घ अभ्यास,
उद्योजकांसोबतचे उत्तम स्नेहबंध यांतून
डॉ. अनंत सरदेशमुख यांनी मांडलेले
व्यावसायिक यशाचे मर्म,
त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील
आठ प्रेरक यशोगाथा म्हणजे
उद्योजकतेची आकांक्षा बाळगणाऱ्यांसाठी दीपस्तंभच!

अशी ही 'उद्योग यशोगाथा' वाचायलाच हवी....

उद्योग यशोगाथा

**डॉ. अनंत सरदेशमुख**



Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO, Pune)
Periodical post




प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**